रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १३१
www.ramprahar.com
मंगळवार, २८ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

उरणमध्ये अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान/३
ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला यात्रांतून मिळतेय बळ/५
अखेर हार्दिक पांड्याची मुंबईत घरवापसी/८

## शुभ वर्तमान! डेंग्यूवरची लस नव्या वर्षी होणार उपलब्ध



**नवी दिल्ली :** डेंग्यूमुळे होणाऱ्या मृत्यूंवर लवकरच नियंत्रण मिळवण्यात यश येणार आहे, कारण डेंग्यूवरची लस बाजारात येत आहे. ही लस पुढील वर्षी बाजारात येऊ शकते, अशी माहिती भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (आयसीएमआर) दिली. यामुळे डेंग्यू रुग्णांना दिलासा मिळणार आहे. तिसऱ्या टप्प्यात १० हजारांहून अधिक लोकांवर या लसीची चाचणी करण्यात आली. आयसीएमआरच्या एपिडेमियोलॉजी आणि कम्युनिकेबल डिसीजच्या प्रमुख डॉ.निवेदिता गुप्ता यांनी डेंग्यूच्या लसीवर काम सुरू असल्याचे सांगितले. मुलांसाठी आणि प्रौढांसाठी वेगवेगळ्या लस तयार करण्यात आल्या आहेत. प्रौढ लसीच्या दोन चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. लहानग्यांच्या लसीच्या पहिल्या टप्प्याची चाचणी पूर्ण झाली आहे. डेंग्यूवर अद्याप इलाज नाही. यामुळे लस महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

# ‘अवकाळी’ग्रस्त शेतकऱ्यांना मदत करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दिलासा

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसामुळे पिकांची हानी झाली आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल पाठवण्यास सांगितले आहे. शासनाच्या धोरणानुसार शेतकऱ्यांना मदत केली जाईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासित केले आहे. ते सोमवारी (दि.२७) नागपूर येथे पत्रकारांशी बोलत होते.





कोकण, मराठवाडा, विदर्भासह राज्याच्या विविध भागात रविवारपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. यामुळे पिकांचे नुकसान होऊन शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. नागपूर दौऱ्यावर असलेल्या फडणवीस यांना या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकार मदत करणार असल्याचे सांगितले.

अवकाळी पावसाने विदर्भासह राज्यातील अनेक भागांत अवकृपा केली आहे. अवेळी पडलेल्या या पावसामुळे हातातोंडाशी आलेल्या शेतमालाचे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदानुसार राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाने हजेरी लावली. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसला असून शासनाने नुकसानीचे पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. याची दखल घेत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मदत करणार असल्याचे सांगत दिलासा दिला आहे.

दरम्यान, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमदारांच्या अपात्रतेबाबतच्या सुनावणीवर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी भाष्य केले नाही, तर महायुतीचे जागावाटप अंतिम झाले नाही. २६/२२ हा जागावाटपाचा आधार असेल, पण तीनही पक्षांच्या चर्चेच्या वेळी तो बदलू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

# शेकाप माजी नगरसेवक सुनील बहिराचा भाचा रूपेश पगडेच्याही पोलिसांनी आवळल्या मुसक्या

## महिलांना जबरी मारहाण व दमदाटी भोवली!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांधकाम मटेरियल सप्लायवरून वाद करीत तक्का गावातील महिलांना दमदाटी आणि गंभीर मारहाण करणाऱ्या रूपेश पगडे या दोन महिने फरार असलेल्या आरोपीच्या मुसक्या पनवेल पोलिसांनी आवळल्या असून न्यायालयाने त्याची रवानगी कारागृहात केली आहे. विशेष म्हणजे शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी चार दिवसांपूर्वी गजाआड झालेल्या सुनील बहिरा या शेकापच्या माजी नगरसेवकाचा रूपेश हा सख्खा भाचा आहे. त्यामुळे मामा-भाचा जेरबंद झाल्याची चर्चा तक्का परिसरात रंगली आहे.



मारहाण आणि दमदाटी करून दहशत माजवण्याचा प्रयत्न झाल्यामुळे दीपिका धर्मा पगडे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. या संदर्भात दीपिका पगडे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, पनवेल रेल्वेस्थानकाजवळ पूर्व बाजूस असलेल्या सईद मुल्ला यांच्या जागेवर आमचे कुटूंब ४० वर्षांपासून शेती करीत होते. काही दिवसांपूर्वी ही जमीन विकसित करण्यासाठी देण्यात आली असून त्या जागेवर मानस ग्रुप बिल्डर इमारती उभारण्याचे काम करीत आहे. गेली अनेक वर्षे जमीन कसत असल्याने भविष्यात त्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये आम्हाला काम देण्याचे संमतीपत्र जमिनीचे मालक सईद मुल्ला यांनी दिले होते, पण मानस ग्रुपने सुनील बहिरा यांना वर्कऑर्डर देऊन त्यांच्याकडून कामे करून घेत असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत वर्कऑर्डरची विचारणा करण्यासाठी संबंधित जागेवर आई संगीता व वडील धर्मा पगडे हे गेले होते.

यानंतर थोड्या वेळातच त्यांचा फोन आला की तक्का गावातील सोनू रूपेश पगडे, कृतिका कल्पेश बहिरा, सीमा निलेश बहिरा, निलेश बहिरा, रूपेश पगडे, तन्मय बहिरा, कल्पेश बहिरा आणि गोरख बहिरा हे आठ जण त्या ठिकाणी येऊन वर्कऑर्डरवरून वाद घालत शिवीगाळ करीत आहेत. त्यामुळे मी, माझी वाहिनी सोना व माझी काकी कल्पना भांडण सोडविण्यासाठी गेलो असता या आठ जणांनी आम्हालासुद्धा शिवीगाळ केली तसेच साईटवर असलेल्या लाकडी फळ्या व बांबूने मारहाण करण्यास सुरुवात केली. या दरम्यान रूपेश पगडे याने त्याच्या हातातील सेंटरिंगच्या लाकडी फळीने काकी कल्पना पगडे हिच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारून जबर दुखापत केली तसेच निलेश बहिरा व तन्मय बहिरा यांनी त्यांच्या हातातील लाकडी फळीने वाहिनी सोना पगडे हिच्या पाठीवर व शरीरावर ठिकठिकाणी मारहाण करून दुखापत केली. त्याचबरोबर निलेश बहिरा याने माझ्या पाठीवर लाकडी फळीने माझ्या पाठीवर मारहाण केली. तेथे जमलेल्या लोकांनी भांडण सोडवले. त्या वेळी ’तुम्ही परत कामासाठी इकडे आलात तर तुम्हाला परत मारू’ अशी धमकी देऊन ते सर्व आठ जण त्या ठिकाणहून निघून गेले. मग मी, माझी आई, काकू व मोठा भाऊ तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आलो असता आम्ही जखमी असल्याचे लक्षात आल्याने पोलिसांनी आम्हाला रिपोर्ट देऊन वैद्यकीय उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. काकू कल्पना हिच्या डाव्या हाताच्या मनगटाला फ्रॅक्चर झाल्याने तिच्यावर निकम परमार या रुग्णालयात दुसऱ्या दिवशी ऑपरेशन करावे लागले, असेही दीपिका पगडे यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

# कुणबी प्रमाणपत्रासाठी कागदपत्रांमध्ये खाडाखोड; मंत्री भुजबळांचा आरोप

**पुणे : प्रतिनिधी**

मराठवाड्यात जर निजाम काळातील नोंदी सापडल्या व त्यात कुणबी उल्लेख असेल तर ते आपोआपच कुणबी होतील. त्यानंतर जात पडताळणीचाच विषय राहतो. जे खरे कुणबी आहेत त्यांना घ्या, आमची काही हरकत नाही, मात्र खाडाखोड करून जी कागदपत्रे दाखवली जात आहेत त्याला आमचा आक्षेप आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांकडे काही कागदपत्रे पाठवली. पेनाने कुणबी लिहिले जात आहे. आम्ही त्याचाच विरोध करतो आहोत, असे ओबीसी नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. ते सोमवारी (दि.२७) पत्रकारांशी बोलत होते.



जातीने कुणबी असलेल्या लोकांना कुणबी प्रमाणपत्र शोधून त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे अशी मूळ मागणी होती. सगळा तपास व्हावा यासाठी न्यायमूर्ती शिंदे समिती स्थापन झाली. समितीचे काम सुरू झाल्यानंतर पहिल्यांदा त्यांनी जाहीर केले की पाच हजार कुणबी प्रमाणपत्रे मिळाली आणि तेलंगणामध्ये निवडणूक सुरू असल्यामुळे त्यांना जात येत नाही. काही लोकांनी आग्रह धरला की ते साडेअकरा हजार झाले. नंतर हा आकडा वाढत गेला, पण महाराष्ट्रातील कुणबी लोकांनी यापूर्वीच प्रमाणपत्र काढले आहे. निजामशाही आणि वंशावळीप्रमाणे प्रमाणपत्रे मिळाली आहेत. त्यामुळे आता समितीचे काम संपले आहे, असेही मंत्री भुजबळ या वेळी म्हणाले.

## जरांगे-पाटील यांच्याकडून ‘तो’ शब्द अखेर मागे!



**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

लायकी नसलेल्यांच्या हाताखाली काम करावे लागतेय, असे विधान मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी पुण्यातील खराडी येथील सभेत केले होते, पण हे विधान आक्षेपार्ह ठरत असल्याने लायकी हा शब्द आपण मागे घेतो, असे जरांगे-पाटील यांनी जाहीर केले आहे.

जरांगे-पाटील यांनी सोमवारी (दि.२७) प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले की, माझा म्हणायचा उद्देश तसा नव्हता, कारण मी कधीही जातीयवाद करीत नाही आणि कधीही केलेला नाही. माझा म्हणण्याचा उद्देश आणि अर्थ वेगळा होता, पण काहींनी त्या शब्दाचा विनाकारण गैरसमज केला, तर काहीजण त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न करायला लागले. म्हणून मी तो शब्द मागे घेतो, परंतु आमचे मराठा आरक्षणापासून ध्येय हटणार नाही.

## निवडक

### पंतप्रधान मोदींनी घेतले तिरुपती बालाजीचे दर्शन

**तिरुमाला :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.२७) पहाटे तिरुपती बालाजी मंदिरात भगवान व्यंकटेश्वराचे दर्शन घेतले. या वेळी त्यांनी विधीवत पूजा-अर्चाही केली. ’तिरुमला येथील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात १४० कोटी भारतीयांच्या उत्तम आरोग्य, कल्याण आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे.

### पुणे-लोणावळा स्टेशनदरम्यान स्वयंचलित सिग्नल कार्यान्वित

**लोणावळा :** पुणे ते लोणावळा विभागात खडकी ते पुणे स्थानकांदरम्यान स्वयंचलित सिग्नलिंग यंत्रणा बसविण्याचे काम रेल्वेने मेगाब्लॉक घेऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले. यामुळे पुणे-लोणावळा विभागात ६४ किलोमीटरचे स्वयंचलित सिग्नलिंगचे काम पूर्ण झाले आहे. पुढील काळात या गाड्यांना होणारा विलंब कमी होणार असून त्यांचा वेगही वाढणार आहे.







(छाया : योगेश पाटील)

# ‘जेबीएसपी’च्या शाळा-महाविद्यालयांमध्ये केबिन, प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोपर येथे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या (जेबीएसपी) रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल तसेच मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयातील चेअरमन व प्राचार्य केबिन आणि प्रशासकीय कार्यालयाचा उद्घाटन सोहळा सोमवारी (दि.२७) झाला.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकत्रित इमारतीचे बांधकाम कोपर येथे सुरू आहे. यामधील चेअरमन केबिनचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते, प्राचार्य कार्यालयाचे राज अलोनी यांच्या हस्ते आणि प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन सचिव डॉ.एस.टी.गडदे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, दर्शन ठाकूर, वसंत पाटील, प्रकाश भगत, संजय भगत, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील पाटील, भाऊशेठ पाटील, मनोहर ओवळेकर, हरिश्चंद्र ठाकूर, अविनाश कुलकर्णी, आदित्य ठाकूर, अपूर्व ठाकूर आदी उपस्थित होते.

# मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींवर अन्याय करणार नाही

## मुख्यमंत्र्यांची भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

आरक्षणाच्या विषयावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि ओबीसी समर्थक मंत्री छगन भुजबळ आणि यांच्यात संघर्ष सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, माझी छगन भुजबळ यांच्याशी चर्चा झाली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यास छगन भुजबळ यांचा विरोध नाही. मराठा आरक्षणाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींवर कुठल्याही प्रकारच्या अन्याय केला जाणार नाही. यासाठी सरकार युद्धपातळीवर काम करीत आहे. मागासवर्ग आयोगही त्यावर काम करतोय.



कुणबी जात प्रमाणपत्रास होत असलेल्या विरोधावर मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ज्यांच्या जुन्या कुणबी नोंदी आहेत त्यांना प्रमाणपत्र देण्याची अधिसूचना आपण काढलेली नाही. ही अधिसूचना १९६७ साली काढण्यात आली होती. तेव्हापासून तिचा अवलंब केला जात आहे. छगन भुजबळांची एवढीच मागणी आहे की, ओबीसींचे आरक्षण कमी होऊ नये. हीच भूमिका सरकारचीदेखील आहे.

# पनवेलमध्ये संविधान महोत्सव उत्साहात

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय छावा संघटना, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर, यशकल्प फाउंडेशन आणि प्रबोधन सामाजिक संस्थेच्या वतीने संविधान महोत्सवाचा समारोप, बक्षीस वितरण आणि संविधान प्रत वाटप कार्यक्रम रविवारी (दि.२६) नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.




(छाया : प्रफुल्ल कांबळे)

नवीन पनवेल येथील के.आ. बांठिया विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमास माजी नगरसेवक ॲड.प्रकाश बिनेदार, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यवाह महेंद्र नाईक, संविधान संवादक चित्रलेखा जाधव, पनवेल वकील संघटनेचे खजिनदार ॲड.सचिन कांबळे, अध्यक्ष सुधीर चाकोले, उपाध्यक्ष पुरनसिंह मेहरा, देवीदास गायकवाड, ‘युवक आधार’चे संपादक संतोष आमले, रेश्मा कुरूप यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या वेळी बोलताना माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आपल्या हक्कांची माहिती सर्वांना असायलाच पाहिजे, असे प्रतिपादन केले.

## ठाण्यात कुमार गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचा थरार

**ठाणे : प्रतिनिधी**

प्रशांत जाधवर फाउंडेशन आणि विठ्ठल क्रीडा मंडळाच्या वतीने कुमार, कुमारी गटाच्या सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद मुख्यमंत्री चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना, ठाणे जिल्हा कबड्डी संघटना आणि ठाणे महापालिकेच्या सौजन्याने होणाऱ्या या स्पर्धेचा थरार १ ते ५ डिसेंबरदरम्यान कॅडबरी जंक्शन येथील जुन्या जे.के. केमिकल्सच्या मैदानावर पाहायला मिळेल.


स्पर्धेचा शुभारंभ राज्याचे उद्योग व उच्च तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थित होईल, तर विजेत्यांना गौरवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित असणार आहेत. याशिवाय केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य कबड्डी संघटनेचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार, ठाण्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई कबड्डीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

# वातावरणातील बदलांचा मासेमारीलाही फटका

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

अवकाळी पावसामुळे शेती व शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना वातावरणातील बदलांचा मासे मिळण्यावरही परिणाम होताना दिसून येत आहे. गिलनेटने मासे पकडणाऱ्या छोट्या व्यावसायिकाची स्थिती गंभीर आहे. यावर अवलंबून असणाऱ्या हजारो मच्छीमार कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

मासेमारी व्यवसायावर मच्छीमारांची कुटुंब अवलंबून असतात. या व्यवसायातून एरव्ही मोठी उलाढाल होते, मात्र यंदा पावसाळ्यानंतरच्या तीन महिन्यांत ही उलाढाल कमी झाली. त्यामुळे मच्छीमारांची आर्थिक घडी विस्कटली आहे. ऑगस्ट महिन्यापासून पारंपरिक मासेमारीपाठोपाठ पर्ससीननेट मासेमारीही सुरू झाली, पण मासे मिळण्याचे प्रमाण घटले आहे. वातावरणातील बदलांमुळे मासेमारी नौका किनाऱ्यावरच नांगरून ठेवण्यात येतात. वातावरण निवळले की मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊनही अत्यल्प मासे मिळतात. त्यामुळे त्या फेरीचे गणित विस्कटते.



### मच्छीमार हवालदिल

वातावरणातील बदलांमुळेच मत्स्यसाठ्यांवर परिणाम झाल्याची शक्यता व्यक्त केली जात असून काहींनी अत्याधुनिक यंत्राच्या वापरामुळे किनारी भागात मासे कमी प्रमाणात मिळत असल्याची खंत व्यक्त केली आहे. मासे कमी मिळाले की खलाशांचा खर्चही भागत नाही. मासे मिळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे निर्यातीवरही परिणाम होत आहे.

डिझेलचा खर्च, बर्फ, खलाशांचा पगार व भत्ता, जाळी व इंजिन दुरुस्ती आदीवर दररोज होणारा भागवण्याचे आव्हान मच्छीमारांपुढे आहे. बँकेचे कर्ज तसेच व्यापाऱ्यांकडून घेतलेल्या आगाऊ रकमेची परतफेड यासारख्या आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागत आहे. गेले चार दिवस ढगाळ वातावरण असून पाऊसही पडत आहे. त्यामुळे किनारी भागात वारेही वाहत असल्याने मासे खोल समुद्रात जातात. परिणामी पुढील काही दिवस पुन्हा मासे मिळणे अवघड असल्याचे चित्र आहे.

# समृद्धी महामार्गावर नियम न पाळल्यास कारवाई

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १५ इंटरसेप्टर वाहने महामार्ग पोलिसांना हस्तांतरित

**ठाणे : प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर विहित वेगमर्यादेचे व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्फे एकूण १५ इंटरसेप्टर वाहने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी (दि. २७) महामार्ग पोलिसांना हस्तांतरित करण्यात आली. ठाणे येथे पार पडलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री महोदयांनी झेंडा दाखविल्यानंतर सर्व वाहने समृद्धी महामार्गाच्या दिशेने मार्गस्थ झाली.



७०१ किमी लांबीपैकी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा नागपूर ते भरवीर, ता. इगतपुरी (६०० किमी) वाहतुकीस खुला आहे. हजारो वाहने समृद्धीचा प्रतिदिन वापर करीत आहेत. समृद्धी महामार्गावरील वाहतूक सुरळीत तसेच अपघातांना आळा घालण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांनी १५ महामार्ग पोलिसांच्या केंद्राकरिता इंटरसेप्टर वाहन उपलब्ध करून देण्याची विनंती महामंडळांकडे केली होती. त्या अनुषंगाने महामंडळाकडून १५ स्कॉर्पिओ वाहनांची खरेदी करण्यात आली. इंटरसेप्टर वाहनांसाठी आवश्यक असलेल्या सर्व उपकरणांची जोडणी महामंडळातर्फे करण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत ही वाहने अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली.

या वेळी आमदार प्रताप सरनाईक, आमदार रवी फाटक, महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, सहव्यवस्थापकीय संचालक संजय यादव, अनिलकुमार गायकवाड व पोलीस अधीक्षक (महामार्ग पोलीस पथक) अरविंद साळवे, नरेश म्हस्के व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महामार्गावर बहुतांश ठिकाणी दोन्ही बाजूने संरक्षक भिंत उभारण्यात आली असून वन्य प्राण्यांची व मोकाट जनावरांची ये-जा होऊ नये म्हणून क्रॅश बॅरिअरच्या बाजूने चेन लिंक फेन्सिंग उभारण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक शीघ्र प्रतिसाद वाहने २१, रुग्णवाहिका २१, ईपीसी गस्त वाहने १४, महामार्ग सुरक्षा पोलीस केंद्र १३, ३० टन क्षमतेची क्रेन १३, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत १४२ सुरक्षा रक्षक अशा प्रकारच्या उपाययोजना सज्ज ठेवल्या आहेत.

# दुकानांवर मराठी पाट्या न लावणाऱ्यांना पनवेल महानगरपालिकेकडून नोटीसा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारणा अधिनियम २०२२ मधील कलम ३६ 'क' नुसार सर्व दुकाने, संस्था, वाणिज्य आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्यगृहांच्या नामफलक मराठी भाषेमध्ये असणे बंधनकारक आहे. त्यानुसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार पनवेल महापालिका हद्दीतील चारही प्रभागांमधील मराठी नामफलक नसलेल्या ३५१ दुकाने व आस्थापानांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत, तसेच प्रत्येक प्रभागात स्पीकरद्वारे जाहीररित्या सांगितले जात आहे.

ज्या आस्थापनांनी अजूनही अमराठी पाट्या बदलल्या नाहीत अशा आस्थापनांचा प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत सर्वेक्षण सुरू असून त्यांना महापालिकेकडून कारवाईच्या नोटीसा बजावण्यात येत आहेत. प्रभाग अ, ब, क डमधील सुमारे ३५१ दुकाने तसेच आस्थानांना आत्तापर्यंत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता शुक्रवारी (दि.२४ नोव्हेंबर) उपायुक्त गणेश शेटे यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात सूचनाही दिल्या होत्या.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनेक दुकाने व आस्थापनांवरील नामफलक फक्त इंग्रजीत व अन्य भाषेत आहेत. काही फलकांवर नावे मराठी भाषेत लिहीलेली जरी असली तरीही ती औपचारीकता म्हणून कोपऱ्यात लहान अक्षरात लिहीलेली आहेत. नियमाप्रमाणे दुकाने किंवा आस्थापनांवरील नामफलक हे ठळक मराठी लिपीत तर असावाच त्याचप्रमाणे इतर कोणत्याही भाषेपेक्षा लहान नसावा असे नमूद आहे. त्यामुळे अशा दुकानदारांना कारवाईच्या नोटीसा बजावण्यात आल्या असून यापुढेही नोटीसा बजावण्याची कार्यवाही सुरूच राहणार आहे.

# दिवाळे शाळेच्या पुनर्विकासासाठी १० कोटींचा निधी मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील दिवाळे गावातील ग्रामस्थांची शाळा गेली ७० वर्षांहून अधिक जुनी असून ती मोडकळीस आली आहे. यामुळे सर्व पालकांनी स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांना भेटून समस्या सांगितल्या आणि निवेदन दिले. याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासोबत चर्चा करून शाळेसाठी निधी मंजूर करून आणला आहे. शाळेचा तळ अधिक एक मजला इमारत बांधण्याकरिता १० कोटी अपेक्षित खर्च येणार आहे.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, प्राथमिक शाळा ही एक अशी व्यवस्था आहे, जिथे विद्यार्थ्यांची सर्व विषयांची तोंडओळख होते. आजच्या काळात गावठाण विभागात प्राथमिक शाळेचे फार दयनीय अवस्था आहे. प्राथमिक शिक्षण हे प्रत्येक मुलांना मिळालेच पाहिजे या दृष्टीकोनातून दिवाळे गावातील ग्रामस्थांच्या शाळेचा पुनर्विकास करून मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी मी प्रयत्नशिल आहे, असे त्यांनी सांगितले.

आमदार मंदा म्हात्रे यांचे दिवाळे गावातील नवी मुंबई मनपा शाळा क्र. २च्या मुख्याध्यापिका, शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी आभार मानले व दिवाळे ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारली

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून बिघडलेली मुंबईतील हवेची गुणवत्ता सुधारण्यास अवकाळी पावसामुळे मदत झाली आहे.

मुंबई उपनगरासह राज्यातही विविध ठिकाणी रविवारी (दि. २६) पावसाची हजेरी पाहायला मिळाली. यामुळे मुंबईतील ठासळलेली हवेची पातळी आता कुठे पुर्वपदावर येताना दिसत आहे.

दिवाळीपूर्वी मेट्रो आणि इतर बांधकाम आणि त्यानंतर दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी यामुळे मुंबईतील हवेचा दर्जा घसरला होता, पण आता अवकाळी पावसानंतर मुंबईच्या हवा गुणवत्तेत सुधारणा होताना दिसत आहे.

# त्रिपुरारी पौर्णिमेला प्रतापगड पाच हजार दिव्यांनी उजळला

## पाचशे किलो फुलांची रंगावली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आणि सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील प्रतापगडावर मशाल महोत्सवाचे प्रणेते आणि शिवकालीन खेडेगावचे संकल्पनाकार आप्पा उतेकर यांच्या प्रयत्नांनी शिवभक्त आणि देवीभक्तांनी त्रिपुरारी पौर्णिमेला श्रीभवानी माता मंदिर परिसरात पाच हजार दिवे अन् ५०० किलो झेंडूच्या फुलांची शुभरंगावली साकारली.



(छाया: शैलेश पालकर)

दरवर्षी प्रतापगड येथे सातारा, रत्नागिरी, कोल्हापूर आणि रायगड जिल्ह्यातील शिवभक्त आणि आई भवानीदेवी भक्तांची विविध उपक्रमांना आवर्जून उपस्थिती असते. प्रतापगडावर हस्तकला केंद्र आणि प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या शिवकालीन खेडेगांवचे संकल्पनाकार आप्पा उतेकर यांच्या प्रयत्नांतून दरवर्षी अश्विन पंचमीला मशाल महोत्सवाचे आयोजन केले जात असते. यंदा त्रिपुरारी पौर्णिमेला श्री आई भवानी देवीच्या मंदिर परिसरामध्ये पाच हजार दिवे व ५०० किलो झेंडूच्या फुलांची शुभरंगावली साकारण्यात आली.

प्रतापगडावरील नंदिनी संतोष जाधव यांनी शिवकालीन वेशभुषेसाठी पेहेराव आणि आभूषणे तसेच हत्यारे हातात घेऊन अनेक शिवभक्तांना मोबाईलवर आपआपले फोटो काढण्याची संधी उपलब्ध करून दिली.

# विहिर खोदण्याचे साहित्य चोरताना तिघांना पकडले

**माणगाव : प्रतिनिधी**




विहिर खोदण्याचे साहित्य कारमध्ये भरून चोरून घेऊन जात असताना तीन आरोपींना रंगेहात पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना उणेगाव गावच्या हद्दीत सुरेश सत्वे यांच्या शेतात घडली. याबाबतची फिर्याद राजेश विठ्ठल राठोड (वय ३५, रा. रोहिदास नगर दासगाव, महाड) यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात दिली.

आरोपी किरण रमेश राठोड (वय २७, रा. ढाळघर फाटा, माणगाव), मंगेश शिवराम नलावडे (वय ३४, रा. माणगाव), दिपेश यशवंत सत्वे (वय ३०, रा. उणेगाव, माणगाव) यांनी फिर्यादी राजेश राठोड यांच्या मालकीचे एकूण ३४ हजार ३०० रुपये किमतीचे विहिर खोदण्याचे साहित्य गाडीमध्ये भरून चोरून घेऊन जात असताना आढळले. याप्रकरणी आरोपींवर गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गोरेगाव उपनिरीक्षक पी. एस. कपडेकर हे करीत आहेत.

# लोधिवली गावात विकसित भारत संकल्प यात्रेचे जोरदार स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात विकसित भारत संकल्प यात्रा सुरू झाली आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने संकल्प विकसित भारत यात्रेचा रथ ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे आगमन झाल्यावर ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले.

विकसित भारत यात्रा रथाचे पूजन सरपंच पुजा तवले यांनी केले, तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन उपसरपंच समीर दळवी, ग्रामपंचायत सदस्य चेतन मेश्राम, रेखा भुईकोट, सुरेखा मोरे, सुशिला भुईकोट, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हार व महिला बचत गट सदस्यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी शिक्षक, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशासेविका, ग्रामस्थ उपस्थित होते. २६/११ रोजी शहीद झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. संकल्प शपथ घेऊन संविधान उद्देशिकेचे वाचन करून केंद्र व राज्य सरकारमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यात आली.



# विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमात नोंदणी करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४च्या अनुषंगाने सहकार्य करावे व ९ डिसेंबरपर्यंत जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

त्याचप्रमाणे व्होटर सर्च पोर्टलद्वारे आपले नाव प्रारुप मतदार यादीत आहे किंवा नाही हे तपासावे तसेच नवीन मतदार नोंदणी, वगळणी वा दुरुस्तीदेखील करू शकता अधिक माहितीसाठी व्होटर हेल्पलाईन १९५० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले आहे.

सर्व मतदार केंद्रावर मतदार नोंदणीकामी विशेष शिबिरामध्ये २ व ३ डिसेंबर रोजी तृतीयपंथी व्यक्ती, देह व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया व भटक्या विमुक्त, आदिवासी जमातीतील व्यक्ती मतदार नोंदणी करण्यात येणार आहे. दावे व हरकती निकालात काढणे आणि मतदार यादीची शुद्धता तपासणी व अंतिम तपासणीसाठी आयोगाची परवानगी मागणे २६ डिसेंबरपर्यंत करायची आहे.

डाटाबेस अद्यावत करणे पुरवणी याद्यांची छपाईसाठी १ जानेवारी २०२४पर्यंत तर मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणेसाठी ५ जानेवारी, २०२४ निश्चित करण्यात आली आहे, तसेच १ जानेवारी २०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची १०० टक्के मतदार नोंदणी करण्याच्या अनुषंगाने २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीमध्ये सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

# मोरे महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**पोलादपूर** : सुंदरराव मोरे महाविद्यालयामध्ये संस्थापक व माजी ग्रामविकास मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून ३० नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी इच्छूकांनी रासेयो अधिकारी प्रा. डॉ. राम बरकुले (९८८१८२३७६७), प्रा. डॉ. जयश्री जाधव -पाटील (९२९४१९४४५३), आजीवन विभाग कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नाथीराम राठोड (९२७२५८५८१५), प्रा. मनोज भगत (७५०७२८७०३९) या क्रमांकावर संपर्क साधावा.

पान १ वरुन

# शेकाप माजी नगरसेवक सुनील बहिराचा भाचा रूपेश पगडेच्याही पोलिसांनी आवळल्या मुसक्या

दरम्यान, या गंभीर गुन्ह्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, मात्र रूपेश पगडे आणि त्याच्या साथीदारांनी पलायन केले होते. त्यांच्यावर भारतीय दंड कलम १८६० नुसार ३२४, १४३,१४४, १४६, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ तसेच ३२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. फरार झालेल्या आरोपींपैकी सात जणांचा अटकपूर्व जामीन झाला, तर रूपेश पगडे याला जामीन न झाल्याने तो फरारच होता. अखेरीस २१ नोव्हेंबरला आकुर्ली गावातून त्याच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. त्याची २३ नोव्हेंबरला रवानगी तळोजा कारागृहात करण्यात आली आहे. त्यामुळे तक्का गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त करतानाच गावगुंडांना धडा शिकवल्याची प्रतिक्रिया गावात उमटत आहे.

# आपला दवाखाना योजनेसाठी कंत्राटी भरती

**मुंबई** : 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेंतर्गत दवाखाने चालवण्यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि औषध निर्माता यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून अर्जाचा नमुना ३० नोव्हेंबरपर्यंतच प्रदर्शित केला जाणार आहे.

पात्र उमेदवारांची प्रतीक्षायादी तयार करण्यात येणार असून आवश्यकतेप्रमाणे त्यांची भरती केली जाणार आहे, अशी माहिती कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह यांनी दिली. रिक्त पदानुसार व जसेजसे आपला दवाखाना केंद्र कार्यान्वित करण्यात येतील त्यानुसार नियुक्तीचे आदेश दिले जातील, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# धर्मवीर २ चित्रपटातील दृश्य कापावे लागणार नाही -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे : प्रतिनिधी**

काही लोकांना सिनेमा खटकला, काही लोक सिनेमा बघता-बघता उठून गेले. काहींना चित्रपटातील दृश्य आवडली नाहीत, असा टोला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'धर्मवीर २' चित्रपटाच्या मुहूर्त कार्यक्रमात बोलताना केले. आता कोणाला काही आवडो किंवा ना आवडो धर्मवीर २ चित्रपटातील दृश्य आता कापावे लागणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



ठाणे येथील कोलशेत भागात धर्मवीर २ चित्रपटाचा मुहूर्त कार्यक्रम सोमवारी (दि. २७) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात बोलताना धर्मवीर या चित्रपट प्रदर्शितदरम्यान घटना सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. धर्मवीर चित्रपट चांगला झाला. सगळ्यांनी मेहनत घेतली, पण काही लोकांना सिनेमा खटकला, काही लोक सिनेमा बघता-बघता उठून गेले. काहींना चित्रपटातील दृश्य आवडली नाहीत, असा टोला त्यांनी लगावला, पण आता कोणाला काही आवडो या ना आवडो कारण, आता फुलफायनल अथोरिटी आपणच आहोत, असे सांगत त्यांनी धर्मवीर २ चित्रपटातील दृश्य आता कापावे लागणार नसल्याचे स्पष्ट केले.

काहींना त्या वेळी अजीर्ण झाले आहे. आता त्या लोकांना वर्षभरापूर्वी गोळी दिली आहे. आनंद दिघे यांच्या तालमीत तयार झालेले असल्यामुळे कधी छोटी आणि कधी मोठी गोळी द्यायची हे माहित होते. कधी इंजेक्शन पण द्यावे लागते तर कधी ऑपरेशन पण करावे लागते. मी डॉक्टर नाही पण, ऑपरेशन केले, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. दिघे यांचे व्यक्तिमत्त्व चित्रपटाच्या एक ते दोन भागांतून दाखवणे शक्य नसून आम्ही या चित्रपटाच्या माध्यमातून सुरुवात केली, असे त्यांनी सांगितले.

## दुखवटा

### दिलीप हातनोलकर

**उरण : वार्ताहर**



चिरनेर येथील दिलीप जगन्नाथ हातनोलकर यांचे वयाच्या ५८व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत सोमवारी (दि. २७) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. ते चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच होते. दिलीप हातनोलकर यांनी शालेय क्रीडा स्पर्धेत तसेच क्रिकेट स्पर्धेत उत्तम कामगिरी केली. उत्तम गोलंदाज व फलंदाज म्हणून त्यांचा पंचक्रोशीत नावलौकिक होता. चिरनेर कलानगर येथील मूर्तिकार म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, वडील, दोन भाऊ, वहिनी, पुतणे असा परिवार आहे.

## निवडक



### प्रबुद्ध संस्थेतर्फे संविधान दिन

**पनवेल** : भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून करंजाडेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय संविधान दिवस प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे पनवेल वतीने साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचनही करण्यात आले.

### नळ चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल** : एकाच सोसायटीमधील वेगवेगळ्या मॉडेलचे ८३ नळ चोरणाऱ्या गुन्हेगारास तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मोरबे गाव येथील सहकारद्वार गृहनिर्माण सोसायटीमधील ४१ फ्लॅटमधून वेगवेगळ्या मॉडेलचे ८३ नळ चोरीस गेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. या तक्रारीनुसार पोलीस पथकाने आरोपी सिद्धेश सुरेश मोर्ये (वय २८) याला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

### होलसेल दुकानातील रक्कम चोरली

**पनवेल** : तालुक्यातील आकुर्ली येथील किराणा दुकानाच्या पाठीमागील भिंतीला भगदाड पाडून चोरट्यांनी गल्ल्यातील २० ते २५ हजार रुपये चोरून नेल्याची घटना घडली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. आईजी ट्रेडिंग होलसेल दुकानात चोरट्यांनी शटर उचकटण्याचा प्रयत्न केला, मात्र शटर उचकटले नाही. त्यामुळे त्यांनी मागच्या बाजूने भिंतीला भगदाड पाडून दुकानात प्रवेश केला आणि गल्ल्यातील अंदाजे २० ते २५ हजार रुपये चोरून नेले. सकाळी दुकानदाराने दुकान उघडले असता त्याच्या हा प्रकार लक्षात आला. या चोरीची माहिती खांदेश्वर पोलिसांना देण्यात आली.

### मोबाईल खेचून दोनजण पसार

**पनवेल** : मोबाईलवर बोलत चालत जाणाऱ्या १८ वर्षीय तरुणीच्या हातातील मोबाईल खेचून दोघेजण दुचाकीवरून पळून गेले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ध्वनी देवनपल्ली ही खांदेश्वर स्टेशनमधून बाहेर येऊन सेक्टर २५कडे जाणाऱ्या रोडने मोबाईल फोनवर आईसोबत बोलत पायी चालत जात असताना पाठीमागून दुचाकी आली आणि त्यातील एकाने तिच्या हातातील मोबाईल खेचला आणि ते दुचाकीवरून पळून गेले. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

# उरणमध्ये अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे नुकसान

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील पुनाडे, चिरनेर, जांभूळपाडा, गावठाण, रानसई, कळंबुसरे या परिसरात सफेद कांदा, वाल, चवळी, शिराळी घोसाळी तसेच इतर पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते, तसेच शेवग्याचे पीकदेखील या परिसरात भरघोस येते, मात्र अचानक आलेल्या पावसाचा या पिकांना फटका बसला असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## कडधान्यासह भाजीपाला लागवडही वाया



भातशेती कापल्यानंतर ऑक्टोबरमध्ये रब्बी पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. त्यानंतर नोव्हेंबरपर्यंत किती पीक येणार याचा अंदाज घेतला जातो. सद्यस्थितीत शेतकऱ्यांनी लावलेल्या पिकांना मोठ्या प्रमाणात फुले आली होती. त्यावरून वाल, चवळी यांसारखी पिके मोठ्या प्रमाणात येतील असा अंदाज परिसरातील शेतकऱ्यांना होता, मात्र रविवारी सकाळी पडलेल्या अवकाळी पावसामुळे आलेली फुले गळून पडली आहेत.

अशीच परिस्थिती शेवग्याचीदेखील झाली आहे. त्यामुळे मार्च, फेब्रुवारी महिन्यात मिळणारे शेवग्याचे उत्पन्न मिळण्याबाबत शेतकरी संभ्रमात आहेत, तसेच पावसामुळे शेतीतील विक्रीकरिता काढलेला पेंढाही भिजला असल्याने खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आला आहे.

**भातशेती झाल्यानंतर वाल, चवळीचे पीक घेतो. या वर्षी मोठ्या प्रमाणात कडवा वाल लावला आहे, मात्र अवकाळी पावसामुळे ही फुले गळाल्याने मोठे नुकसान झाले आहे.**
**–तुकाराम ठाकर, शेतकरी**



### वीटभट्टी व्यावसायिकांनाही बसला मोठा फटका

अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका वीटभट्टीचालकांना बसला आहे. पावसाने सुकवण्यासाठी ठेवलेल्या विटादेखील भिजल्या आहेत. त्यामुळे व्यवसाय सुरू होण्याला अजून उशीर होणार असल्याने मजुरांचा वाढलेला खर्च तसेच कच्च्या मालाच्या झालेले नुकसानीमुळे वीटभट्टी व्यावसायिकांचे अर्थकारण यंदा बिघडणार आहे.

## नेरे येथे आपुलकीचा दीपोत्सव, उडान उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था आणि गिरीजा फाउंडेशनच्या विशेष सहकार्याने अमरदिप बालविकास फाउंडेशन आयोजित २६/११च्या आतंकवादी हल्ल्यात शहिद वीर सुपुत्रांना समर्पित आपुलकीचा दीपोत्सव रविवारी (दि. २६) नेरे येथे झाला. या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा कलाविष्कार उडान २०२३ सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन एन. डी. खान व सुनंदा गणेश सपलिंग यांनी केले होते.




कार्यक्रमाला निवृत्त पोलीस सहआयुक्त एकनाथ खोलम, सिनेअभिनेत्री वर्षा पडवळ, हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे, आदिवासी समाजासाठी झटणारे विलास घरत, प्रा. अंशुल शर्मा, स्नेहा चांदोरकर, पुष्पा सकपाळ, वीर स्वामी संस्थेचे प्रा. संजय हिरेमठ, भाग्यश्री भुजबळ, लिटिल आयडीयल किड्सचे पूनम गुप्ता, मनोज गुप्ता, वूमन पावरचे जितेंद्र टी. व त्यांचे सभासद, अक्कलकोटे क्लासेच्या छाया अक्कलकोटे, शैलेंद्र अक्कलकोटे, शिवशंभू संघटनेचे विजय भोसले, कफचे राजकुमार ताकमोघे, साहित्यिक विलास देवळेकर, शशिकांत सावंत, व्ही. रेड्डी, ज्येष्ठ कार्यकर्ते अब्दुल मुकाद आदी मान्यवर उपस्थित होते.

छोट्या छोट्या मुलांनी नृत्य सादर केले. निवृत्त पोलीस सहआयुक्त एकनाथ खोलम यांनी २६/११चा चित्तथरारक प्रसंग वर्णन करून गाणे गायले. विजय मोरे यांनी संविधान वाचन केले. संजीवन म्हात्रे यांनी मोबाईल या विषयावर प्रबोधन केले. डॉ. स्वरांजली गायकवाड यांनी स्पिरीच्युअल टॅपिंग आणि क्लॅपिंग थेरेपी सर्वांकडून करून घेतली. या कार्यक्रमात वुमेन पावर अँड सोशल अवेरनेस फाउंडेशनच्या वतीने गिरिजा फाउंडेशनच्या सुनंदा सपलिंग व अमरदिप बालविकास फाउंडेशनच्या सलमा खान यांना सन्मानित करण्यात आले. चित्रकला स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या आश्रमातील बालकांना सन्मानित करण्यात आले.

## दत्त मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी वस्तूरूपी मदतीचे आवाहन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस स्टेशनचे सुशोभीकरण आणि पोलीस स्टेशनच्या आवारातील श्रीदत्त मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी परिसरातील दानशूर व्यक्तींनी वस्तूरूपी मदत करून सहकार्य करावे, असे आवाहन रसायनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांनी केले आहे.

पावसाळयात दरवर्षी रसायनी पोलीस ठाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शिरल्याने वस्तूंचे नुकसान होत असते. म्हणून शत्रुघ्न माळी यांनी पोलीस स्टेशनच्या सुशोभीकरणाला व श्री दत्त मंदिराच्या जिर्णोद्धाराच्या कामासाठी पुढाकार घेतला आहे. गेल्या २० वर्षांपूर्वी रसायनी पोलीस ठाण्यातील श्री दत्त मंदिर उभारण्यात आले होते, परंतु सध्या मंदिराची ही अत्यंत दूरवस्था झाल्यामुळे मंदिराचे काम व्हावे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून शत्रुघ्न माळी यांनी दत्त मंदिराचाही जिर्णोद्वार करण्याचा संकल्प हाती घेतला आहे. काही दिवसांवर श्री दत्त जयंती उत्सव येऊन ठेपलेला आहे.

दत्त जयंतीच्या शुभमुहूर्तावर रसायनी पोलीस ठाणे व दत्त मंदिर सुशोभीकरण झालेले पहावयास मिळेल. यासाठी दात्यांनी वस्तूरुपी भेट देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करून कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत स्वीकारण्यात येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.



पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या निधीतून बारवई येथील अंतर्गत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, पोयंजे पं.स. अध्यक्ष प्रवीण ठाकूर, प्रवीण काळबागे, सरपंच नियती बाबरे तसेच नारायण पडवळ, नामदेव मुंढे, अनंता मुंढे, बबन मुंढे, सुनील दळवी, गणेश आगविले, देवीदास पाटील, महेंद्र पाटील, वामन पडवळ, किर्ती दळवी, ललिता पडवळ, दिलीप दळवी, संजय मुंढे, गुरुनाथ मुंढे आदी उपस्थित होते.



पनवेल : २६/११च्या हल्ल्यामुळे अनेक वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच निष्पाप नागरिक शहीद झाले होते. या हल्ल्यावेळी पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे हे तेथे कर्तव्य बजावत होते. त्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती तसेच पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, उमेश पोतदार, अभिषेक भोपी यांच्यासह पदाधिकारी आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.







पनवेल : शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खारघर, कळंबोली आणि नवीन पनवेलमधील गुरुद्वाराला भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक संतोष शेट्टी, बबन मुकादम, अमर पाटील, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर शहराध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा नेते हॅप्पी सिंग, अभिषेक भोपी, अक्षय सिंग आदी उपस्थित होते.



पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका प्रमिला पाटील यांना वाढदिवसानिमित्त सोमवारी भाजपच्या कळंबोली येथील कार्यालयात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी उपस्थित होते.

## गुळसुंदे येथे ब्राह्मण संस्थेतर्फे स्नेहसंमेलन

**मोहोपाडा** : गुळसुंदे येथे जिल्हा ब्राह्मण संस्थेतर्फे एकदिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन रविवारी (दि. ३) करण्यात आले आहे. या वेळी एकाचवेळी चार मंदिरात अर्थवशीर्ष रूद्र, शिवमहिमा पाठ व पुरुष सुक्त, श्रीसुक्त, श्रीरामाचा जप किंवा रामरक्षा पठणही होणार आहे. यानंतर गुणवंतांना प्रशस्तीपत्रक व भेटवस्तू प्रदान, निवडक सदस्यांचे मनोगत होणार आहे.





पनवेल : त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री रामेश्वर महादेव मंदिर देवस्थान आणि भाजपचे जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या जाणीव एक सामाजिक संस्थेकडून महाआरती आणि दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन रामेश्वर महादेव मंदिर येथे रविवारी करण्यात आले होते. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते तसेच महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून उत्सवास सुरुवात करण्यात आली. पनवेलकरांनी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहत दर्शनाचा आणि दीपोत्सवाचा आनंद लुटला. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, भाजप शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, सरचिटणीस रुपेश नागवेकर, महेश सरदेसाई, अंजली इनामदार, लीना पाटील, श्वेता खैरे, स्नेहल माळी, संजीवनी खिल्लारे, स्वाती पवार, विक्रम ठाकूर आणि देवस्थानचे सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत रामेश्वर महादेव मंदिर देवस्थानचे ट्रस्टी उमेश इनामदार यांनी केले.


## संपादकीय

# बंधूभाव जपणे महत्त्वाचे

जरांगे-पाटील आणि भुजबळ यांच्यामध्ये सध्या जे जाहीर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत, त्यामुळे राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. आपल्या समाजाची बाजू आक्रमकपणाने मांडण्यामध्ये काहीच गैर नाही. किंबहुना नेत्यांचे ते कर्तव्यच असते, परंतु अशी बाजू मांडताना जी भाषा वापरली जाते, त्यामुळे वातावरण बिघडत जाते.

**गेले दोन-अडीच महिने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून महाराष्ट्रात जे रान पेटले आहे, त्यामुळे राज्यभरातील वातावरण ढवळून निघाले आहे. काहीशा गढूळ झालेल्या या वातावरणाचा दुष्परिणाम जसा राजकारणावर होत आहे, तसाच तो समाजकारणावरदेखील होताना दिसतो आहे. मराठा आंदोलनामुळे समाजाच्या इतर वर्गांवर परिणाम होत नाही ही शहरी समजूत सपशेल चुकीची आहे. नुकत्याच झालेल्या कार्तिकी एकादशीच्या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची मनोभावे पूजा पार पडली, परंतु मराठा आंदोलनाचा परिणाम या पुजेच्या वेळीदेखील दिसून आला. पंढरपुरामध्ये मोठा बंदोबस्त ठेवावा लागला होता. कार्तिकी एकादशीला पंढरपुरात भक्तांची मांदियाळी दाटून येते, परंतु यंदा ही संख्या रोडावल्याचे निदर्शनास आले. मराठा आरक्षण मिळावे यासाठी काही वर्षांपूर्वी सकल मराठा समाजातर्फे ५८ मूक मोर्चे निघाले होते. अतिशय शांतपणे हे मोर्चे पार पडले, तेव्हा साऱ्याच समाजाने मराठा आंदोलकांना सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्या वेळी मुख्यमंत्रीपदी असलेल्या फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आणि निम्मी-अधिक लढाई जिंकून दिली होती. फडणवीस सरकारने दिलेले मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकू शकले नाही याला कारणीभूत नंतर सत्तेवर आलेले महाविकास आघाडीचे निष्क्रिय सरकार होते. अंतरवाली सराटी या गावामधून मराठा आंदोलनाची हाक देणारे नवे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या हाती आता आंदोलनाची सूत्रे आली आहेत. जरांगे-पाटील यांनी मात्र कुठलाही मुलाहिजा न बाळगता आक्रमकपणे मराठा आंदोलन पुढे रेटले. कुठल्याही परिस्थितीत कुणबी प्रमाणपत्रे प्राप्त करून ओबीसी वर्गातच आरक्षण मिळवण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. मराठा आंदोलकांच्या या नव्या पवित्र्याला ओबीसी वर्गाकडून कडाडून विरोध होणार हे उघड होते. तसा तो होताना सध्या दिसत आहे. शिंदे सरकारमध्ये मंत्रीपदी असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी जरांगे-पाटील यांच्या पवित्र्याला कडाडून विरोध सुरू केला असून त्यासाठी त्यांनी दोन जंगी सभा घेतल्या. मराठा आंदोलक आणि ओबीसी नेत्यांमधील कलगीतुऱ्यामुळे एकंदरीतच समाजजीवन अस्वस्थ झाल्याचे चित्र दिसत आहे, ते मात्र गंभीर आहे. मिळालेल्या कुणबी नोंदी आरक्षणासाठी ताबडतोब ग्राह्य धरल्या पाहिजेत असे जरांगे-पाटील वारंवार म्हणतात. यामुळे आपल्या वाट्याचे आरक्षण कमी होणार या चिंतेने ओबीसी नेत्यांना ग्रासले आहे. सर्वांना पटेल असा मार्ग यामधून कसा काढायचा हा खरा यक्ष प्रश्न आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नी माजी न्यायाधीश संदीप शिंदे यांची समिती वेगाने कार्यरत झाली आहे. शिंदे समितीच्या शिफारशी स्वीकारण्यास मुख्यमंत्री शिंदे यांनी यापूर्वीच अनुकुलता दर्शवली आहे, परंतु ओबीसी नेत्यांना ते मान्य नाही. भुजबळ यांनी तर शिंदे समिती बरखास्त करावी अशीच मागणी केली आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर सुटून महाराष्ट्रात बंधूभाव नांदावा हीच सर्वांची इच्छा आहे.**

# सशस्त्र क्रांतिकारक सेनापती बापट




सेनापती बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक. पूर्ण नाव पांडुरंग महादेव बापट. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरणग्रस्त गावांकरिता व शेतकऱ्यांकरिता बापट यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातील जे शेकडो सत्याग्रही सहभागी झाले त्यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यामुळे 'सेनापती बापट' या शब्दावलीने ते ओळखले जाऊ लागले. सेनापती बापट यांचा आज स्मृतीदिन आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथे बापट यांचा गरीब कुटुंबात जन्म झाला. आईचे नाव गंगाबाई. माध्यमिक आणि बीएपर्यंत, तर उच्च शिक्षण मुख्यत्वे करून पुणे येथे झाले. डेक्कन कॉलेजमध्ये सशस्त्र क्रांतीद्वारे भारत स्वतंत्र करण्याची शपथ तलवारीवर हात ठेवून त्यांनी घेतली. बीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून ते इंग्लंडला गेले. एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक विचारांचा प्रचार करीत असल्यामुळे शिष्यवृत्ती बंद होऊन त्यांचे शिक्षण अपुरे राहिले.

श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारक नेत्याशी परिचय होऊन त्यांच्या मदतीने पॅरिस येथे राहून तेथील रशियन क्रांतिकारकांकडून प्रचंड स्फोटक बॉम्ची तंत्रविद्या त्यांनी हस्तगत केली. त्या तंत्रविद्येची पुस्तिका भारतात व बंगालमधील क्रांतिकारक गटांपर्यंत पोहचविली. क्रांतिकारकांच्या कटाच्या एका खटल्यात माफीच्या साक्षीदाराने बापटांचे नाव उघडकीस आणल्यामुळे ते १९८ ते १९१२पर्यंत चार वर्षे अज्ञातवासात राहिले. नंतर १९२१पर्यंत स्वत:च्या जन्मगावी शिक्षक म्हणून राहिले आणि समाजसेवेचे व्रत घेतले. पहाटे उठल्याबरोबर गावचे रस्ते झाडणे व शौचकूप साफ करणे हे व्रत त्यांनी जन्मभर स्वीकारले. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालविले. या आंदोलनात कारागृहवासाची तीनदा शिक्षा त्यांना झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेत असताना राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल अनेकदा अनेक वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

संस्थांनी प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या आंदोलनात भाग घेऊन संस्थानाच्या प्रवेशबंद्या त्यांनी मोडल्या, त्याबद्दल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढविरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. आंदोलन करीत असताना कारागृहात आंदोलनाला पूरक अशा तऱ्हेचे साहित्य लिहिले व ते प्रकाशित केले. त्यांनी अपुरे राहिलेले छोटेसे आत्मचरित्र लिहिले आहे. बरेचसे लेखन मराठीत व थोडे इंग्रजीत व संस्कृतमध्ये केले, लेखनाला पद्याकार दिला. क्रांतिवादी राजकारणाचे समर्थन करणारे, भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले, राष्ट्रमुक्ती व अन्याय प्रतिकार या दोन मुद्द्यांना अनुसरून युक्तिवाद केलेले हे साहित्य आहे. चैतन्यगाथा हे पुस्तक वाचले म्हणजे त्यांचे मूलभूत विचार लक्षात येतात. मराठीमध्ये योगी अरविंदांच्या इंग्लिशमधील आध्यात्मिक तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा उत्कृष्ट अनुवाद बापटांनी केला आहे. अरविंदांचा दिव्यजीवन हा मोठा ग्रंथ बापटांनी प्रसन्न शैलीने मराठीत उतरविला आहे. त्यांचे साहित्य समग्र ग्रंथ (१९७७) म्हणून साहित्य व संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रसिद्ध झाले आहे.

# गायक-नट रामकृष्णबुवा वझे



महाराष्ट्रातील थोर गायक रामकृष्णबुवा वझे यांचा जन्म २८ नोव्हेंबर १८७२ रोजी सावंतवाडी संस्थानातील ओझरे गावी जन्म. ते दहा महिन्यांचे असतानाच त्यांचे वडील वारले. पुढे त्यांची आई त्यांना घेऊन कागल येथे आली आणि मोलमजुरी करू लागली. त्यांचे बालपण फार कष्टात व हालअपेष्टांत गेले. जेमतेम मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. लहानपणापासून बुवांना गाण्याचा नाद होता. त्यामुळे कागलचे गायक बळवंतराव पोहरे यांच्याकडे त्यांचे गाण्याचे प्राथमिक शिक्षण झाले. नंतर ते मालवणला गेले आणि वर्षभर विठोबाआण्णा हडप यांच्याकडे तालीम घेतली.

वयाच्या बाराव्या वर्षी रामकृष्णबुवांचे लग्न झाले. त्यानंतर गवई होण्याच्या तीव्र इच्छेपोटी त्यांनी घर सोडले व पायी प्रवास करून इंदूर गाठले. तेथे सुप्रसिद्ध पखवाज वादक नानासाहेब पानसे यांच्याकडे ते राहिले. गाणे शिकण्याची रामकृष्णबुवांची जिद्द जाणून पानसे यांनी त्यांना ग्वाल्हेरला जाण्यास सांगितले. बुवा ग्वाल्हेरला आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध उस्ताद निसार हुसेनखाँ यांच्याकडे गाणे शिकू लागले. माधुकरी मागून, अत्यंत कष्टाने व जेथून जे मिळेल तेथून ते घ्यायचे अशा वृत्तीने त्यांनी ग्वाल्हेरला गानविद्या संपादन केली व नंतर लौकिक मिळविण्यासाठी ते बाहेर पडले. स्वामी विवेकानंद यांच्या सहवासात ते पंधरा दिवस राहिले होते. अनेक गवयांचाही त्यांनी सहवास केला. गाणे ऐकावयाचे व प्रसिद्ध कलावंतांची सेवा करून विद्या मिळवायची अशी त्यांची वृत्ती होती. गायक म्हणून नेपाळला ते एक वर्षभर होते. आपल्या भ्रमणात ते अनेक कलावंतांना ऐकून शक्य तेथे त्यांच्याकडून बंदिशी मिळवत व संग्रह करीत आपली विद्या संपन्न करीत होते. बारा वर्षांनंतर ते परत आपल्या गावी आले. काही वर्षे गोव्यात राहून वझेबुवांनी अनेक शिष्य-शिष्या तयार केल्या. ते गाण्याच्या शिकवण्या करीत असत. 'बलवंत संगीत मंडळी' आणि 'ललितकलादर्श' या नाटकमंडळ्यांमध्ये ते संगीतगुरू म्हणून काही काळ राहिले. मुंबई, पुणे, धारवाड इ. अनेक ठिकाणी त्यांचे या तऱ्हेने वास्तव्य झाले. आयुष्याच्या अखेरीस ते पुण्यात स्थायिक झाले व तेथेच त्यांचे ५ मे १९४३ रोजी निधन झाले.

रामकृष्णबुवा वझे हे संगीतक्षेत्रात अत्यंत भरतीदार गवई, विद्वान, रंगतदार व बहुरंगी कलावंत असून 'गायनाचार्य' म्हणून मान्यता पावले होते. अनेक कलावंतांच्या सहवासामुळे त्यांनी स्वतःच्या गायकीचे एक वेगळेच वैशिष्ट्य निर्माण केले होते. त्यांचा आवाज बुलंद होता आणि लयदार आलापी, लडिवाळ बोलउपज आणि वजनदार ताना हे त्यांच्या गायकीचे वैशिष्ट्य होते. मराठी रंगभूमीला संगीत देऊन त्यांनी नाट्यसंगीतात मोलाची भर घातली. त्यांच्या संगीत कलाप्रकाश (१९३८) या पुस्तकात त्यांच्या काही चिजा समाविष्ट आहेत तसेच त्यांचे आत्मचरित्रही थोडक्यात दिले आहे. त्यांचे चिरंजीव शिवरामबुवा वझे, हरिभाऊ घांगरेकर, केशवराव भोसले, मा. दीनानाथ, बापूराव पेंढीरकर, भालचंद्र पेंढारकर, दन्नीबाई, तानीबाई, कागलकरबुवा वगैरे कलावंत मंडळींचा त्यांच्या शिष्यवर्गात समावेश होतो.

## बदलते तंत्रज्ञान




# मोबाईल रिचार्ज केल्यास द्यावे लागणार जास्तीचे पैसे

गेल्या काही वर्षांमध्ये भारतात पेटीएम, गुगल पे, फोनपे ॲप्सचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. ही देशातील प्रमुख यूपीआय ॲप्स आहेत. या ॲप्सद्वारे लोक पैसे देणे, बिल भरणे, गॅस, फ्लाइट, विमा, मोबाइल रिचार्ज, बँक ट्रांसफरसारखी सर्व प्रकारची कामे करतात. ही सर्व कामे आतापर्यंत मोफत केली जायची, पण आता यासाठी तुम्हाला काही रक्कम त्या यूपीआय ॲपला द्यावी लागणार आहे.


मीडिया रिपोर्ट्सनुसार पेटीएम आणि गुगल पे शी संबंधित अपडेट आले आहे. या ॲप्सद्वारे तुम्ही तुमचा मोबाइल रिचार्ज केल्यास तुम्हाला संबंधित प्लॅटफॉर्मला ठरावीक फी भरावी लागेल. म्हणजेच मोबाईल रिचार्जच्या रकमेव्यतिरिक्त तुम्हाला आणखी काही पैसे द्यावे लागतील.

सोशल मीडियावरील अनेक युजर्स पेटीएमवरुन रिचार्ज केल्यानंतर आकारण्यात येणाऱ्या प्लॅटफॉर्म शुल्काचा स्क्रीनशॉट शेअर करत आहेत. कंपनी रिचार्ज पॅकनुसार वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर शुल्क आकारत आहे. हे शुल्क पेमेंटनुसार १ रुपये ते ६ रुपये आहे. एअरटेलवर एका वर्षासाठी २,९९९ रुपयांचा रिचार्ज केल्यास कंपनी ५ रुपये प्लॅटफॉर्म शुल्क घेईल.

Gadgets ३६०च्या रिपोर्टनुसार Google Payने देखील सर्व्हिस चार्ज आकारण्यास सुरुवात केली आहे. कंपनी ७४९ रुपयांच्या प्लॅनवर तीन रुपये प्लॅटफॉर्म शुल्क आकारत आहे. कंपन्या हे शुल्क का आकारत आहेत? असा प्रश्न तुम्हाला पडत असेल, तर कंपन्या यूपीआय ॲपच्या सेवेच्या बदल्यात तुमच्याकडून हे शुल्क आकारत आहे.

Google Pay आणि Paytm नेदेखील फोन पेचा मार्ग अवलंबण्यास सुरुवात केली आहे आणि आता या दोन्ही कंपन्या प्लॅटफॉर्म फी आकारत आहेत. फोनपे बऱ्याच काळापासून मोबाईल रिचार्जवर प्लॅटफॉर्म शुल्क आकारत आहे. यामुळे युजर्स फोन पे ऐवजी Google Pay आणि Paytm द्वारे रिचार्ज करण्यास प्राधान्य देत होते, परंतु आता या ॲप्सनीदेखील प्लॅटफॉर्म फी आकारण्यास सुरुवात केली आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले



महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. ते एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, विचारवंत, समाजसेवक, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या.

सप्टेंबर १८७३मध्ये महात्मा फुले यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संघटना स्थापन केली. त्यांनी स्त्रियांच्या आणि मागासलेल्या आणि अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अनेक कामे केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण देण्याचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. ते भारतीय समाजात जात-आधारित विभाजन आणि भेदभावाच्या विरोधात होते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले.

१९व्या शतकात महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. फुले यांना स्त्री-पुरुष भेदभावापासून वाचवायचे होते. त्यांनी

## निमित्त

पुण्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा बांधली. त्या वेळच्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेमुळे फुले खूप व्यथित आणि दु:खी झाले होते, म्हणूनच त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी स्वतः त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या.

महात्मा जोतीराव फुले एका वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपूर्वी साताऱ्याहून पुण्यात आले आणि फुलांचे गजरे बनवू लागले. त्यामुळे माळीच्या कामात गुंतलेली ही माणसे 'फुले' म्हणून ओळखली जायची. ज्योतिबांनी काही काळापूर्वीपर्यंत मराठीतून शिक्षण घेतले, ते सोडून दिले आणि नंतर वयाच्या २१ व्या वर्षी इंग्रजीमध्ये सातवीचे शिक्षण पूर्ण केले. १८४०मध्ये त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला. त्या नंतर स्वत: प्रसिद्ध समाजसेविका झाल्या. पती-पत्नी दोघांनीही दलित आणि स्त्री शिक्षण क्षेत्रात एकत्र काम केले. ते एक कष्टकरी आणि सामाजिक कार्यकर्ता होते.

गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून १८८८मध्ये मुंबईत एका विशाल सभेत त्यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली. ज्योतिबांनी ब्राह्मण-पुरोहिताविना विवाह विधी सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. ते बालविवाहाच्या विरोधात होते आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक होते. आपल्या हयातीत त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजी, राजा भोसला का पखडा, किसान का कोडा, अस्पृश्य की कैफियत अशी अनेक पुस्तकेही लिहिली. २८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी पुणे येथे त्यांचे निधन झाले.

**(साभार : वेबदुनिया)**

## क्लिक...क्लिक...!



श्रीवर्धन : सूर्यास्ताच्या वेळी दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर मनमुराद आनंद लुटताना पर्यटक. (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर



# खूप तहान लागणेसुद्धा शरीरास ठरू शकते हानीकारक

शरीर निरोगी ठेवायचे असेत तर दररोज पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पाण्यामुळेच शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात, ज्यामुळे मनुष्य अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. पाणी पिल्यानंतरच अन्न पचण्यासही मदत होते. याशिवाय वजन कमी करण्यासाठी पाणीदेखील उपयुक्त ठरू शकते, परंतु तुम्हाला माहिती आहे का, जास्त तहान लागणेदेखील आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

जर तुम्हाला ही वारंवार तहान लागत असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. तुम्हाला जर जास्त तहान लागत असेल तर काळजी घेणे आवश्यक आहे, कारण हे कोणत्यातरी आजारांचे लक्षणंदेखील असू शकते.

**मधुमेह :** वारंवार तहान लागत असेल तर मग रक्तातील साखर वाढल्याचे हे लक्षण असू शकते. शरीरातील साखरेचे प्रमाण वाढले की, आपले शरीर लघवीद्वारे ती काढून टाकण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते आणि जास्त तहान लागते.

**अशक्तपणा :** शरीरात हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होतो. ही समस्या महिलांमध्ये जास्त दिसते. हे अनेक कारणांमुळे होऊ शकते, जसे की खराब आहार किंवा जास्त रक्तस्त्राव. या स्थितीत तुम्हाला जास्त तहानही लागते. यामध्ये चक्कर येणे, थकवा येणे, घाम येणे आणि इतर लक्षणे देखील असू शकतात.

**वारंवार तोंड कोरडे पडणे :** तोंड कोरडे पडल्याने तहान लागण्याची समस्या निर्माण होते. अतिधुम्रपान, जास्त प्रमाणात औषधे घेणे इत्यादींमुळेदेखील ही समस्या उद्‌भवते. त्यामुळे तोंड कोरडे पडण्याची समस्या वारंवार उद्‌भवते, ज्यामुळे जास्त तहान लागते. तोंड कोरडे पडत असल्यास दुर्गंधी, चव बदलणे, हिरड्या जळणे आणि अन्न चघळण्यास त्रास होऊ शकतो.

**वारंवार लघवी होणे :** गर्भधारणेमुळेदेखील तहान लागण्याची समस्या उद्‌भवते. पहिल्या तीन महिन्यात रक्ताचे प्रमाण वाढते ज्यामुळे मूत्रपिंडात जास्त द्रव तयार होतो, ज्यामुळे वारंवार लघवी होते. याशिवाय शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त तहान लागते.

## निवडक

### सर्पमित्रांनी दिले सापाला जीवदान

**मुरूड** : एकदरा गावातील पेंटर तथा सर्पमित्र महेश



साळुंखे यांनी कुंभारवाड्यातील दत्तात्रेय राजपुरकर यांच्या घराच्या मागच्या बाजूस असणाऱ्या शेतात धामण जातीच्या सापाला पकडून जीवदान दिले. दत्तात्रेय राजपुरकर आपल्या शेतात काम करीत असताना साप त्यांना दिसला. ग्रामस्थांनी वनविभागाला कळविले. साप पुढे जात असताना तिथे असणाऱ्या जाळ्यात अडकल्याने सुटण्यासाठी थडपडत होता. त्वरीत वनपाल विजय कोजबे यांनी सर्पमित्र महेश साळुंखे यांना घटनास्थळी बोलवून जाळ्यात अडकलेल्या सापाला सुखरूप बाहेर काढून वनक्षेत्रात सोडून दिले.

### खांबेटे वाचनालयात संविधान दिन



**म्हसळा** : शहरातील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, संचालक आर. एस. माशाळे, हेड कॉस्टेबल बाबासाहेब जिजाबा बोंगाणे, सुर्यकांत जाधव, ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगुले उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते भारताचे संविधान, भारतीय राज्यघटना, आम्ही आणि आमचे संविधान, भारतीय राज्य घटना आणि राज्य व्यवहार, आपले संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चित्रमय चरित्र, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, ब्रिटीश संविधान, अमेरिकन संविधान व अन्य पुस्तकांचे प्रदर्शन लावण्यात आले होते.

### कर्जतमध्ये गडगडाटासह पाऊस

**कर्जत** : तालुक्यात रविवारी (दि. २६) पहाटेच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त हालिवली, वांजळे आदी गावांमध्ये भैरवनाथाची यात्रा असते. यात्रा असलेल्या गावातील ग्रामस्थांचा हिरमोड झाला. सकाळी ६ ते ७ वाजण्याच्या दरम्यान पाऊस पडल्याने हालिवली व वांजळे गावामध्ये काकड आरती करणाऱ्या भाविकांचा हिरमोड झाला, तर संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास गडगडाटासह पावसाने सुरुवात केल्याने यात्रेसाठी नटून थटून तयार असलेल्या आबालवृद्धांचा हिरमोड झाला. विट उत्पादकांच्या तोंडचे पाणी पळाले. शेतीचेही पुन्हा एकदा मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गामध्येही चिंतेचे वातावरण आहे.

# ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला यात्रांमधून बळ

## रायगडात विविध यात्रांना सुरुवात; नागरिकांमध्ये उत्साह



**रायगड : रामप्रहर वृत्त**

कार्तिकी एकादशीपासून रायगडात विविध यात्रा सुरू झाल्या आहेत. खोपोली येथील साजगावची यात्रा सुरू झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर यात्रीही युरू होतात. यामध्ये अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वराची यात्रा, मापगाव येथील कनकेश्वराची यात्रा, वरसोली गावातील विठोबाची यात्रा भरते. डिसेंबर महिन्यात दत्त जयंतीनिमित्त चौल–भोवाळेची यात्रा सुरू होते. पुढे एकविरा देवीचा यात्रा उत्सव झाल्यानंतर अनेक गावांमध्ये ग्रामदेवतांच्या जत्रा भरतात. या यात्रांमधून कोट्यावधींची उलाढाल होत असल्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे अर्थकारण सुधारण्यास मदत होत आहे.

खोपोली येथील साजगावच्या बोंबल्या विठोबाची यात्रा ही सुमारे १५ दिवस चालते. या यात्रेमध्ये सुकी मासळी, विविध भांडी, कपडे, घोडे, बैलांची विक्री, खाद्यपदार्थ, मनोरंजनाचे खेळ यामुळे १५ दिवस हा परिसर फुलून गेलेला असतो. मनोरंजनाचे अनेक कार्यक्रम व बच्चे कंपनीसाठी पाळणे व अन्य साधने यात्रेत असल्याने ही यात्रा परिसरातील नागरिकांसाठी वेगळा आनंद घेऊन येत असते.

अलिबाग तालुक्यातील आवास गावात नागेश्वराचे मंदिर आहे. या यात्रेची शेतकरी वर्ग मोठ्या आशेने वाट पाहत असतात. नागेश्वर यात्रेचे खास आकर्षण म्हणजे बैलगाडी आहे. या यात्रेत शेतकरी आपली बैलगाडीतून दर्शनाला येतात. यामुळे यात्रेला विशेष महत्त्व आहे, तर मापगाव येथील श्री क्षेत्र कनकेश्वर येथे त्रिपुरारी पौर्णिमेला प्राचीन काळापासून भरणाऱ्या यात्रेत भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. मागील काही वर्षांपासून ही कनकेश्वरची यात्रा दोन दिवस भरत आहे.

रायगडमधूनच नव्हे तर पुणे, कल्याण, मुंबई, महाड आदी भागातून लोक यात्रेला भेटी देत असतात. खाऊची दुकाने, विविध मनोरंजनाची साधने, खेळणी, आकाश पाळणे या पारंपरिक मनोरंजनाच्या साधनांबरोबरच आता अत्याधुनिक इलेक्ट्रीक पाळणेदेखील पहायला मिळतात. खाद्यपदार्थांमध्ये नवनवीन प्रकार आले असले तरी बैलाच्या चरख्यातून काढलेला उसाचा रस आणि गरमागरम जिलेबीचा आस्वाद जत्रेला येणारे भाविक आवर्जून घेत असतात.

## खोपोली रेल्वेस्थानकातील अरूंद प्रवेशद्वारामुळे अडचणी

### उपाययोजना करण्याची प्रवाशांची मागणी



(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक असलेल्या खोपोली रेल्वेस्थानकाबाहेर संरक्षक भिंत घालण्याचे काम सुरू आहे. स्थानकाच्या तिकीट घराकडे बाजूस प्रवेशद्वार ठेवण्यात आले असून, तो प्रवेशमार्ग फारच अरुंद आहे. संपूर्ण रेल्वे स्थानकात एकच प्रवेशद्वार असल्याने बाहेर पडण्यासाठी प्रवाशांची लगबग असते. यात बाहेर पडण्याच्या वेळेस अनेकदा धक्काबुक्की होऊन त्यात वाद झाल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे याबाबत त्वरीत उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

खोपोली शहर झपाट्याने वाढत असून, या ठिकाणी परिसरात मुंबईचे मोठमोठे औद्योगिक प्रकल्प आल्याने खोपोलीत येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यातच खोपोली शहरात शाळा, महाविद्यालय, बँका, तसेच शासकीय कार्यालय असल्याने या ठिकाणी मुंबई, कर्जत व इतर गावांतील नागरिकांची कामानिमित्त वर्दळ सुरू असते. पूर्वी स्थानकात संरक्षक भिंत नसल्याने प्रवासी मधूनच बाहेर पडत असत, मात्र संरक्षक भिंत घातल्याने एकच प्रवेशारातून बाहेर पडण्यासाठी प्रवाशांची तारांबळ उडते. यासाठी अन्य छोटा बाहेर पडण्यासाठी प्रवेशद्वार ठेवण्यात यावा, अशी मागणी प्रवासी संघटनेने रेल्वेप्रशासनाकडे केली आहे.

या मागणीचा जर विचार प्रशासनाने केला नाही तर प्रवाशांचे आंदोलन उभे करावे लागेल, असे संघटनेतर्फे सांगण्यात आले आहे.

## कर्तव्यावर असलेल्या आरोग्यसेवकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्यसेवक पाणी तपासणी करीत असताना त्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. चंद्रकांत आंबाजी वारगुडा असे मृत आरोग्यसेवकाचे नाव आहे.



आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अंजप हे उपकेंद्र असून तेथे चंद्रकांत आंबाजी वारगुडा हे आरोग्यसेवक म्हणून जबाबदारी पाडत होते. शनिवारी (दि. २५) दुपारी १२.३० वाजता ते आपले सहकारी ज्ञानेश्वर पारधी आणि मोहन तिवरे यांच्यासोबत पाणी तपासणीसाठी बोरिवली ग्रामपंचायतमधील सराईवाडी येथे जाण्यासाठी निघाले होते. दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास तिघे सोबत चालत असताना आरोग्यसेवक चंद्रकांत आंबाजी वारगुडा हे अचानक कोसळले. त्यांच्या तोंडाला दगड लागला आणि त्यांच्या चष्म्याची काच फुटून डोळ्यावर लागली होती.

मोहन तिवरे आणि ज्ञानेश्वर पारधी यांनी त्यांच्या उचलून बाजूला असलेल्या आदिवासी कुटुंबाच्या घरात नेले. सराईवाडी येथील एका फार्महाऊस मालकाची खासगी गाडी घेऊन जखमी चंद्रकांत आंबाजी वारगुडा यांना कशेळे ग्रामीण रुग्णालयात आणले. डॉक्टरांनी तपासले असता वारगुडा यांचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर करण्यात आले.

चंद्रकांत वरगुडा यांचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी नेण्यात आला. चंद्रकांत आंबजी वारगुडा यांच्या आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. शवविच्छेदनानंतर त्यांचा मृतदेह अंतिम संस्कार करण्यासाठी सुधागड तालुक्यातील त्यांचे मूळ गावी नेण्यात आला.

## उल्हास नदीघाटावर दीपोत्सवाला कर्जतकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

उल्हास नदी निर्मल जल अभियान आणि श्री विठ्ठल संस्थान दहिवली यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिपुरारी पौर्णिमेला कर्जत आणि दहिवली येथील नदी घाटावर उल्हास दीपोत्सव आयोजित केला होता. या वेळी कर्जतकरांनी उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



डोळ्यांचे पारणे फिटणारा या नयनरम्य सोहळ्यात भव्य रांगोळी, तुळशी वृंदावन, आकाश कंदील आणि सभोवती असलेल्या असंख्य दिव्यांनी उल्हास नदीघाट उजळून निघाले होते. कर्जत आणि दहिवलीमधील राजकीय सामाजिक नेते, कलाकार आणि प्रत्येक क्षेत्रातील असंख्य नागरिकांनी या सोहळ्याला हजेरी लावली.

कर्जतमधील प्रत्येक नदीघाटावर दरवर्षी हा दीपोत्सव करण्याचा उल्हास नदी निर्मल जल अभियानाचा मानस आहे.

## तुळशी विवाहाने दिवाळी सणाची सांगता



**खोपोली : प्रतिनिधी**

हिंदू संस्कृतीत तुळशी विवाहाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तुळशी विवाह झाला की, लग्नसराई सुरू होते, तसेच दिवाळी सणाची सांगता होत असते.

कार्तिक शुद्धएकादशी ते पौर्णिमा या कालावधीत हा तुळशी विवाह असल्यामुळे या विवाहानंतर चातुर्मासाची समाप्ती होते. ग्रामीण भागात दरवर्षी तुळशी विवाहाला अंगण तयार करून लालमातीने सारवले जाते. पुरोहित अथवा गावातील ज्येष्ठ नागरिक मंगलाष्टक म्हणत अक्षता टाकून विवाह पार पाडत असतात. तुळशी वृंदावनाची जागा आकर्षक अशी रंगरंगोटी केली जाते.

## मांडला येथे काव्यसंमेलन रंगले

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्थेचे अध्यक्ष, साहित्यिक कैलास पिंगळे यांच्या मुरूड तालुक्यातील मांडला येथील पिंगळे सिटीतील बांबू हाऊस रिसॉर्टमध्ये साहित्यिक, पत्रकार, कवी उमाजी केळुसकर यांच्या अध्यक्षतेखाली काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या काव्य संमेलनात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील ३० कवींनी सहभाग घेतला.



काव्यसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे नाट्य–चित्र अभिनेते शरद कोरडे, कवी–साहित्यिक चंद्रकांत पाटील, कवी म. वा. म्हात्रे, सुजाता दांडेकर, आयोजक कैलास पिंगळे उपस्थित होते.

कवी चंद्रकांत पाटील यांनी काले आयोचे कुशीत ही आगरी भाषेतील कविता, कवी मारुती बागडे यांनी आदिमातेची रुपे ही कविता, कवी म. वा. म्हात्रे यांनी इर्शाळवाडीचे संकट ही कविता, कवी सुरेश भोपी यांनी आय माझी आगरी बोली ही आगरी भाषेतील कविता, कवी नवनाथ ठाकूर यांनी आईविना घर खाली ही कविता, कवी पां. शि. पाटील यांनी पलटी ही कविता, कवी कैलास पिंगळे यांनी हिरवे रान ही कविता, कवी मंगेश म्हात्रे आगरी प्रेम ही आगरी भाषेतील गझल, कवी हरिश्चंद्र दळवी यांनी गावठाण ही कविता, कवी राजेंद्र पाटील यांनी चिंधी ते सिंधूताई ही कविता, कवी जयंत पाटील यांनी कणगा ही कविता सदर केली. प्रमुख पाहुणे शरद कोरडे यांनी लावणी सादर करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सरपंच ऋतिक नागोटकर, ग्रामपंचायत सदस्य दिशा नांदगावकर, ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या उपाध्यक्ष चारुशिला कोरडे, ज्येष्ठ छायाचित्रकार सुरेश खडपे आदींचा सत्कार करण्यात आला.

## काकडा आरती सोहळ्याने ऊर्जा आणि चैतन्य प्राप्त होते –कीर्ती ठाकरे



**चौक : प्रतिनिधी**

मनुष्य जीवनात काकडा आरती हा एक अनुपम्य सोहळा असून जीवनात उर्जा निर्माण करण्याबरोबर चैतन्य प्राप्त होण्याची अनुभूती देणारी भक्ती आहे, असे प्रतिपादन किर्ती राजेंद्र ठाकरे यांनी केले आहे.

खालापूर तालुक्यातील चौक येथील वैश्य समाज महिला मंडळ गेली ७५ वर्षे नित्यनियमाने मंदिरात काकडा आरती करीत आहेत. ७५ वर्ष पूर्ण झाल्याने अमृत महोत्सव साजरा झालेल्या धार्मिक कार्यक्रमांत किर्ती राजेंद्र ठाकरे बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या, शरद पौर्णिमेपासून एक महिना पहाटे मंदिरात जाऊन भगवंताला उठवण्याबरोबर अभ्यंगस्नान आणि पूजा केली जाते. यामुळे कुटुंबाची शक्तीस्थान असेलल्या सर्व महिलांना नव ऊर्जा आणि चैतन्य प्राप्त होते.

## पेणमध्ये ‘आदर्श’च्या कार्यालयाचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

अलिबागप्रमाणेच पेणमध्येही आदर्श पतसंस्थेचा नावलौकिक वाढावा अशा शुभेच्छा आमदार रविशेठ पाटील यांनी पेणमधील पतसंस्थेच्या नूतन कार्यालच्या उद्घाटन प्रसंगी दिल्या.



पेणमधील आदर्श पतसंस्थेच्या नूतन शाखेचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजीत पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील, पालक संचालक रामभाऊ गोरीवले, जनरल मॅनेजर राकेश घरत, शाखा व्यवस्थापक संतोष बुंदके, ॲड. मंगेश नेने आदींसह बँकेचे संचालक, ठेवीदार उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी, गेली २५ वर्षे संस्थापक सुरेश पाटील यांनी आदर्श पतसंस्था नावारूपाला आणली हे भूषणावह आहे. माजी आमदार धैर्यशील पाटील यांनीही शुभेच्छा देताना, देणं आणि घेणं यामागे विश्वासाची भूमिका असेल तरच ती संस्था, बँक पुढे जाईल व असा विश्वास आदर्श पतसंस्थेने जनतेच्या मनात निर्माण केला असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या.

संस्थापक सुरेश पाटील यांनी, बँकेच्या वाटचालीबाबत आढावा घेतला. बँकेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी, ग्राहकांच्या मागणीनुसार पतसंस्थेत नवीन टेक्नॉलॉजीनुसार बदल करून क्यूआर कोड, आरटीजीएस, एनईएफटी, मोबाईल बँकिंग, रिचार्जसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, असे सांगितले. सूत्रसंचालन जगदीश पाटील यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष कैलास जगे यांनी केले.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८९/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रानसई पाणीपुरवठा योजना.. म.औ.वि. महामंडळाच्या रानसई उप विभाग, पनवेल अंतर्गत भंगार साहित्याचा लिलाव करणे, कळंबोली जंक्शन ते उरण फाटा दरम्यानची जुन्या मृदु पोलादी, सी.आय. जलवाहिन्या, स्पेशल्स जसे आहे जेथे आहे या तत्वावर काढणे व पनवेल व तळोजा येथील भांडारगृहात आणणे. (दुसरी मागणी) | ₹ ०.०० |
| २. | महाड व विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड आणि विळे-भगड औद्योगिक परिसरात विविध ठिकाणी विविध प्रकारच्या मृदू पोलादी स्ट्रक्चरला रंग लावणे. (तिसरी मागणी) | ₹ ५,१२,९७०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/११/२०२३ ते दिनांक ०८/१२/२०२३ पर्यंत व अ.क्र. २ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/११/२०२३ ते दिनांक ०४/१२/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ३०/११/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०१/१२/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक



### सुवर्णकार विकास मंडळाची सभा

**पनवेल** : नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची त्रैमासिक सभा रविवारी (दि. २६) नवीन पनवेल येथे झाली. सुरुवातीला संत शिरोमणी नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मंडळाचे अध्यक्ष संजय खरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. मंडळाचे सचिव हेमकांत सोनार यांनी त्रिपुरारी पौर्णिमा आणि भारतीय संविधान दिवस याविषयी माहिती दिली. २६/११च्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, लष्करी अधिकारी व नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेसाठी कार्याध्यक्ष दादासाहेब विसपुते, महिला मंडळ अध्यक्षा संगीता विसपुते, मंडळाचे कोषाध्यक्ष विजय भामरे, उपाध्यक्ष प्रवीण भामरे, कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. शाम विसपुते, सहसचिव छोटुलाल मोरे, मनोज सोनार, उदय विभांडिक, संजय सोनार, श्रीनिवास पोतदार आदी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार सी. डी. मोरे यांनी मानले.

### ज्येष्ठ नागरिकाचे दीड लाख चोरले

**पनवेल** : ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील दीड लाख रुपये दोन अनोळखी चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नौदल विभागातून सेवानिवृत्त झालेले भीष्मकुमार द्विवेदी हे से. ३५, खारघर येथे राहतात. ते बँकेत पैसे काढण्यासाठी गेले होते. पैसे घेऊन ते डिफेन्स कॅन्टीनकडे जात असताना सेक्टर १३ येथे दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी द्विवेदी यांच्या हातातील दीड लाखांची रोख रक्कम व इतर कागदपत्र असलेली बॅग जबरदस्तीने खेचून ते सेक्टर १९च्या दिशेने पळून गेले. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कार-दुचाकी धडकेत दोघे जखमी

**पनवेल** : येथील निसर्ग ढाबा येथे कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी कारचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजीव मिश्रा हे देवद येथे राहत असून ते मोरबे येथे यशवंत यादव यांच्यासोबत काम आटोपून घरी येत होते. निसर्ग ढाबा, हरिग्राम येथे आले असता एका भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात मिश्रा व यशवंत यादव हे जखमी झाले. दोघांवर उपचार सुरू आहेत.

# हुतात्मा बाबू गेनु सैद मैदानाची दूरवस्था

## लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांची होतेय अडचण





**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सानपाडा येथील हुतात्मा बाबू गेनू सैद या मैदानाची अत्यंत दूरवस्था झाली आहे. यामुळे परिसरातील लहानग्यांना खेळण्यासाठी जागाच उपलब्ध नसल्याने त्यांचा हिरमोड होत आहे. याप्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने मैदानाची स्वच्छता करून खेळण्यासाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

सानपाडा परिसरामध्ये मोठमोठी खेळाचे मैदाने तसेच उद्याने उपलब्ध आहेत, परंतु या मैदानाच्या देखभाल दुरुस्ती अभावी त्यांना बकालपण आले आहे. याचेच एक उदाहरण म्हणून या मैदानामध्ये विविध राजकीय पक्ष आणि संस्था यांचे सामाजिक कार्यक्रम झाल्यानंतर मैदानात खड्डे, डेब्रिज इतरत्र पडलेले आढळून येते. याविषयी विभाग कार्यालयाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे संबंधित संस्थांवर कारवाई केली जात नाही. या मैदानाच्या आजूबाजूला असलेल्या सोसायटीमधील रहिवाशी या मैदानामध्ये त्यांच्या गाड्या पार्क करीत असतात. या गाड्या दिवसभर आणि रात्रीही येथे असल्याने गाड्यांचे नुकसान होऊ नये यासाठी मुलांना या मैदानात खेळण्यास मनाई केली जात आहे. यामुळे लहानग्यांच्या आनंदावर विरजण पडत आहे.

त्याचबरोबर याच मैदानामध्ये सानपाडा पोलीस ठाण्याच्या पाठीमागील बाजूस कारवाई केलेल्या व गुन्ह्यात सापडलेल्या गाड्या बेवारस स्थितीमध्ये धुळखात पडून आहेत. मैदानात नियमितपणे स्वच्छता केली जात नसल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून येत आहेत. या मैदानाच्या चारही बाजूंना जॉगिंग ट्रॅक करण्यात आला आहे, परंतु त्याचीही दुरवस्था झाली आहे.

मैदानाच्या पूर्वेकडील सुरक्षा भिंत बांधण्याचे महापालिकेने काम हाती घेतले आहे, परंतु अनेक दिवस हे काम अर्धवट स्थितीत पडून असल्याने त्याची दूरवस्था झाली आहे. याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून अतिक्रमणमुक्त मैदान मुलांना खेळण्यास उपलब्ध करावे, अशी मागणी केली जात आहे.

# नवी मुंबईत भाजपतर्फे विविध उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि. २६) नवी मुंबई भाजपच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संविधान पंधरवडानिमित्त संविधान दिन साजरा करण्यात आला. स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. २६/११मधील हल्ल्यात शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आली, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या १०७व्या भागाचे प्रक्षेपण करण्यात आले.

सीवूड येथे झालेल्या या कार्यक्रमाला भाजप प्रदेश पदाधिकारी वर्षा भोसले, माजी नगरसेवक विशाल डोळस, माजी नगरसेवक विनोद म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश म्हात्रे, भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी संविधानाचा अभ्यास भारतातील सर्व नागरिकांनी करायला हवा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी या वेळी केले. आमदार गणेश नाईक यांनी केलेल्या मागणीनुसार नवी मुंबई शहरातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एनएमएमटीच्या मोफत बसप्रवासाची सुविधा सुरू करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांनी याबद्दल त्यांचे आभार मानले, तर अन्य शहरांच्या तुलनेत नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांना चांगल्या सुविधा मिळत असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केले.

कार्यक्रमात कराटे आणि आर्चरीमधील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा जिल्हाध्यक्ष नाईक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सीवूड सेक्टर ४८ येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक तयार करण्याबाबतची मागणी जिल्हाध्यक्ष नाईक यांच्याकडे या वेळी करण्यात आली.

# केबीपी कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला व २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



या वेळी महाविघालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी एनएसएस व एनसीसीच्या स्वयंसेवकांना भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले, तसेच त्यातील हक्क व कर्तव्याबद्दल मार्गदर्शन केले. ग्रंथालय विभाग आणि एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय भारतीय संविधानाचे वाचन हा उपक्रमही राबवण्यात आला. या उपक्रमात सुमारे पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एनएसएस स्वयंसेवकांनी भारतीय संविधानाबद्दल समाजात जागृती निर्माण व्हावी, यासाठी पोस्टर बनवून समाजमाध्यमावर ती प्रसारित केली. या कार्यक्रमासाठी एनएसएस प्रमुख डॉ. लक्ष्मण गवळी, एनसीसी कमांडर प्रा. सारंग भागवत, ग्रंथपाल मानसी रसाळ डॉ. प्रणिता भाले, प्रा. अमित सुर्वे यांनी मार्गदर्शन केले.



# लायन्स क्लब ऑफ नवी मुंबईतर्फे नृत्योत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई, एपीएमसी यांच्या वतीने विष्णुदास भावे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. 'नृत्योत्सव'च्या या सहाव्या आंतरशालेय गट नृत्य स्पर्धेमध्ये मुंबई आणि नवी मुंबईतील शाळांमधील विद्यार्थ्यांनी सामुहिक नृत्य सादरीकरण केले.

लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई, एपीएमसीने २०१६मध्ये मोठ्या प्रमाणावर समाजासाठी त्यांच्या कल्याणकारी उपक्रमांसाठी निधी उभारण्यासाठी या कार्यक्रमाची सुरुवात केली. तेव्हापासून ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेला शाळा, पालक आणि जनतेचा पाठिंबा लाभला. दिल्ली पब्लिक स्कूल, पवार पब्लिक स्कूल, न्यू होरायझन स्कॉलर्स स्कूल, सेंट मेरीज आयसीएसई, विबग्योर हाय, पोदार इंटरनॅशनल स्कूल, पीव्हीजी विद्या भवन, जयपूरियार स्कूल, दत्ता मेघे वर्ल्ड अकॅडमी आणि डीएव्ही पब्लिक स्कूल या दहा शाळांनी स्पर्धेत भाग घेतला. सहभागींची संख्या ५४२ विद्यार्थी होती. या वर्षी, स्पर्धेची थीम गूढ पौराणिक कथा होती आणि प्रख्यात कलाकार अक्षोभया भारद्वाज, अनन्या यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

# निधी आपके निकट उपक्रमाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

निधी आपके निकट २.० भविष्यनिर्वाह निधीचे सदस्य, नव्याने अंतर्भूत असलेल्या संस्था आणि पेन्शनधारकांसाठी सुरू आहे. या वेळी, पीएफ खातेदार, नव्याने समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी त्यांच्या अखत्यारीतील दोन ठिकाणी भारती विद्यापीठ, सेक्टर ७, सीबीडी बेलापूर येथे आयोजन केले आहे.

नोवाक टेक्नॉलॉजी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड येथे मंगळवारी (दि. २८) रुपा सॉलिटेअर मिलेनियम बिझनेस पार्क म्हापेह नवी मुंबई येथे निधी आपके निकट २.० कार्यक्रमाचे आयोजन करणार आहेत. महिन्याच्या २८ तारखेला निधी आपके निकल २.० या कार्यक्रमात खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे यावे लागू नये यासाठी पीएफ, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्ती वेतन यासंबंधीच्या तक्रारी ऐकून घेतल्या जातील. याशिवाय, नवीन समाविष्ट आस्थापनांच्या नियोक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शन देखील प्रदान केले जाईल. प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान म्हणाले की, सध्या निधी आपके निकटची व्याप्ती वाढवण्याच्या प्रक्रियेत निधी आपके निकट २.० आणण्यात आली आहे. या कार्यक्रमात नोडल अधिकाऱ्याकडून समस्या ऐकून घेऊन त्याचे निराकरण केले जाणार आहे.

# गॅरेजमधील मालाच्या चोरीप्रकरणी दोघे अटकेत

## काही मुद्देमाल जप्त; अन्य दोघांचा शोध सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

तालुक्यातील पारपुंड गाव येथील एका गॅरेजमध्ये चार जणांनी मिळून केलेल्या चोरीप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले आहे, तर अन्य दोघांचा शोध पोलीस घेत आहेत.

येथील ओमेमाँ इंजियरिंग गॅरेज या ठिकाणी असलेल्या वॉचमनला अज्ञात चोरांनी मारहाण करून येथील शेडखाली उघड्यावर ठेवलेला डोझरचे १४ रोलर, आठ कॅरर रोलर आणि इतर भंगार सामान पिकअप टेम्पोमध्ये भरून ते पसार झाले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करताच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार, उपनिरीक्षक हर्षद जुईकर, हवालदार महेश पाटील, अमोल पाटील, पोलीस नाईक मिथुन भोसले, अशोक राठोड, शिपाई विशाल दुधे आदींचे पथक आरोपींचा शोध घेत होते.



दरम्यान मिथुन भोसले यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, गुन्ह्यातील काही आरोपी आंबिवली कल्याण ठाणे येथे लपले आहेत. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपी नसिम मंजूर खान (वय २१), बद्री आलम मेहमुद अलम खान (वय ३८) या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून काही मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे, तर या गुन्ह्यातील इतर दोन आरोपींचा शोध पनवेल शहर करीत आहेत.

# चिरनेरच्या दत्त मंदिरात तुळशी विवाह उत्साहात

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर-कातळपाडा येथील दत्तमंदिरासमोर रविवारी (दि. २६) सायंकाळी ६:३० वाजताचे मुहूर्तावर तुळशी विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कातळपाड्यातून ढोल ताशाच्या गजरात घोड्यावर स्वार झालेल्या ऊस नवरदेवाची लग्नाचा छतीरासह हार-तुऱ्यांनी सजावट करून संपूर्ण गावातून वाजत-गाजत नवरदेवासारखी मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूक दत्तमंदिरासमोर असलेल्या तुळशीपर्यंत पोहचवून तेथे लग्नमंडपात देवा ब्राम्हणांच्या साक्षीने लग्न घटिकेच्या मुहूर्तावर सनई चौघड्याच्या सप्तसुरात वधू तुळशी व वर ऊस यांचा विवाह सोहळा पार पाडण्यात आला.



या वेळी उपस्थितांच्या मनोरंजनासाठी स्वराभिषेक कलामंच आवरे यांच्या सुरेल गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सरपंच, उपसरपंच, सदस्य, भाजपचे प्रतिक गोंधळी, कमलाकर पाटील, चंद्रकांत गोंधळी, हेमंत परदेशी, निवृत्त ग्रामविकास अधिकारी कृष्णा केणी, परशुराम रेवसकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

विवाह सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सुरज पाटील, मिथुन पाटील, करण पाटील, आकाश गोंधळी, अविनाश परदेशी, समीर म्हात्रे, अमर परदेशी, संताजी गोंधळी यांच्यासह कातळपाडा ग्रामस्थांनी मेहेनत घेतली.

# नेरूळमध्ये संविधान दिनानिमित्त व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरूळ ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालयातर्फे ज्येष्ठ नागरिक भवनच्या सभागृहात रविवारी (दि. २६) ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दि. ना. चापके यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.



मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. शं. पा. किंजवडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेचे कार्याध्यक्ष विकास साठे यांनी, ग्रंथालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला आणि व्याख्यानाच्या माध्यमातून प्रबोधनाचे कार्य ग्रंथालय करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर घटनेच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन झाले.

प्रमुख व्याख्याते व संविधानाचे नामवंत अभ्यासक नागेश धोंडगे यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा घटना समितीमधील प्रवेश आणि तद्नंतर त्यांनी भूषविलेले अध्यक्षपद याचे अभ्यासपूर्ण विवेचन करीत भारतीय नागरिकांमध्ये संविधान साक्षरतेची गरज अधोरेखित केली. यानंतर दुसरे वक्ते विश्वास कांबळे यांनीदेखील भारतीय राज्यघटनेचे महत्त्व विशद करून पायाभूत तत्त्वे मजबूत असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अ‍ॅड. रूपाली अधाटे यांनी साध्या सोप्या भाषेत संविधानाचा अर्थ विषद केला. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी असणाऱ्या कायद्यांची माहिती सभागृहात करून दिली. यानंतर पोलीस अधिकारी विशाल माने यांनी, संविधानाची माहिती, तसेच हक्क आणि कर्तव्य याबाबतची माहिती प्रत्येकाला असणे गरजेचे असे विषद करून सांगितले. ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश लखापते यांनीही आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दि. ना. चापके यांनी भारतीय राज्यघटनेच्या चार प्रमुख स्तंभाची माहिती सांगितली. त्यामध्ये उद्देशिकेला समोर ठेवूनच घटनेत बदल करता येतो. घटनेतील मूलभूत तत्व इतकेच मार्गदर्शक तत्त्वेदेखील महत्त्वाची आहेत, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास सर्वश्री अण्णासाहेब टेकाळे, पांडुरंग क्षेत्रमाडे, अरविंद वाळवेकर, प्रभाकर गुमास्ते, अजय माढेकर, प्रवीण पाटील, महादेव देवळे, रणजीत दीक्षित, किरण देशपांडे, दत्ताराम आंब्रे, विजय सावंत, दत्तात्रेय म्हात्रे, नंदलाल बॅनर्जी, लक्ष्मण गावडे, हिंदु राव, सीमा आगवणे, रूपाली माहुलकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयाचे सचिव सुनील आचरेकर यांनी केले.

# नागोठण्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

## नागरिक त्रस्त; ग्रामपंचायतीने उपाययोजना करण्याची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरात सर्वत्र मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची नागरिकांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. टोळीटोळीने फिरणाऱ्या व रहदारीच्या रस्त्यावरच ठाण मांडून बसणाऱ्या या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांना विशेषत: लहान मुले व महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे या मोकाट भटक्या कुत्र्यांचा ग्रामपंचायतीने ठोस उपाययोजनेद्वारे बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.


(छाया : श्यामकांत नेरपगार)

नागोठणे शहरासह परिसरात मोकाट, भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या कुत्र्यांकडून लहान मुले, नागरिक यांच्यावर हल्ला चढवून त्यांना जखमी करण्याचे प्रकारही यापूर्वी घडले आहेत.

नागोठणे शहरातील अनेक मुख्य रहदारीचे रस्ते, बाजारपेठ, मटण व मासळी बाजार तसेच अनेक मोक्याच्या ठिकाणी भटकी कुत्री एकत्रितपणे उभी राहत असल्याने शाळेत जाणारी मुले, बाजारात कामानिमित्त येणारे नागरिक, महिला, सकाळी- संध्याकाळी मोकळ्या हवेत फिरण्यास बाहेर पडणारे वयोवृद्ध लोक या सर्वांना भटक्या कुत्र्यांच्या भीतीचे व दहशतीचे एक प्रकारचे मोठे दडपण घेऊनच चालावे लागत आहे.


नागोठण्यात या भटक्या कुत्र्यांनी मोठ्या प्रमाणात दहशत निर्माण केलेली असतानाच त्यांच्या निर्बिजीकरणासंदर्भात कोणताही ठोस निर्णय नागोठणे ग्रामपंचायत घेत नसल्याने या भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायत यावर कोणती ठोस उपाययोजना करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मैलामिश्रित सांडपाण्याने कुंडलिका नदी प्रदूषित

## पात्रात मोठ्या प्रमाणात घाण आणि दुर्गंधी

**धाटाव : प्रतिनिधी**

मैलामिश्रित प्रदूषित पाणी नाल्याद्वारे थेट नदीत सोडण्यात येत असल्याने रोहा शहरातून बारमाही वाहणारी कुंडलिका प्रदूषित झाली आहे. या नदीपात्रात मोठ्या प्रमाणात घाण व दुर्गंधी पसरली असून वारंवार ही गंभीर बाब निदर्शनास आणूनही प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि नगरपालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले असल्याने नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी रोह्यात सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली आहे. कुंडलिका नदी बचाव समितीचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप वडके यासाठी शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत.


(छाया : जितेंद्र जाधव)

रोह्यात कुंडलिका नदी संवर्धन योजना झाली, परंतु शहराचे मैलामिश्रित सांडपाणी नदीमध्ये सोडण्यात येत असल्याने कुंडलिका नदीतील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. शहराच्या नाल्यांतून वाहणाऱ्या मैलामिश्रित पाण्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित झाले आहे. नाल्याचे पाणी काळेकुट्ट झाले असून त्यामध्ये विविध प्रकारची घाण साचली आहे. सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ पत्रकार आणि कुंडलिका नदी बचाव समितीचे संस्थापक दिलीप वडके यांनी नदी प्रदूषणाचा प्रश्न समोर आणला आहे. यासाठी शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून वडके यांनी नदी प्रदूषणाबाबत पाठपुरावा सुरू ठेवलेला आहे.

नदीमध्ये सुरू असलेल्या मानवनिर्मित प्रदूषणाविषयी प्रदूषण नियंत्रण मंडळाने रोहा नगरपालिलेला पत्र लिहून याविषयी तातडीने कारवाई करावी म्हणून सूचनाही केलेली, परंतु रोहा अष्टमी नगरपालिका प्रशासनाने अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे दिवसेंदिवस कुंडलिका नदीचे अस्तित्व नष्ट होत चालले आहे.

रोहा शहर आणि आसपासच्या परिसरातील नागरी वसाहतीमधील सांडपाणी गटारामार्गे आजही सोडले जात आहे. नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याचे व्यवस्थापन वेगळ्या पद्धतीने करणे आवश्यक असताना या गंभीर समस्येकडे पालिका दुर्लक्ष करीत असल्याचा वडके यांचा आरोप आहे.

नदीचे पाणी पूर्ववत करावे, जेणेकरून ग्रामस्थांना इतर कामांकरिता योजना तयार करून पाणी वापरात आणता येईल. नुकतेच रोहा शहराचा पाणी पुरवठा खंडित झाला होता. असा प्रसंग नेहमीच येत असतो. अशा वेळी नदीचे बारमाही वाहणारे पाणी वापरात येऊ शकते, अशी वडके यांची मागणी आहे.

रोहा अष्टमी शहरातील नदीला मिळणाऱ्या नाल्यातून कुंडलिका नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याच्या कारणावरून नगरपालिकेला सर्व नागरिकांच्या सहीने नोटीस बजावण्याच्या कार्यवाहीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहितीही दिलीप वडके यांनी दिली.

**नगरपालिकेची भुयारी गटार योजना काही तांत्रिक कारणाने रखडली आहे. ती पुनर्जीवित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या योजनेंतर्गत असलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांमार्फत सांडपाण्यावर प्रक्रिया करून सोडले जाईल. त्यासाठी थोडा अवधी लागणार असून नदी प्रदूषणाबाबत तात्पुरती स्वरूपात दुसरी उपाययोजना शक्य नाही.**
**-पंकज भुसे, मुख्याधिकारी, रोहा नगर परिषद**

**नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेकडून ठोस उपाययोजना होणे आवश्यक आहे, मात्र प्रत्यक्षात तसे होत नाही हे रोहा अष्टमीकरांचे दुर्दैव आहे.**
**-नितीन परब, अध्यक्ष, रोहा सिटीझन फोरम**

# सामाजिक कार्यकर्त्या भारती कातकरींचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

आदिवासींच्या विकासासाठी सातत्याने विशेष प्रयत्न करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या भारती दिलीप कातकरी यांचा चौक येथील धारा आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्थेच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि.२६) सन्मान करण्यात आला.

भारती कातकरी यांनी चौक, लोधिवली, नढाळ येथील आदिवासी भागाबरोबरच डोंगरकपारीत राहणाऱ्या दुर्गम भागातील आदिवासी जनतेच्या हितासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी बचत गटांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, कालबाह्य प्रथांचा नायनाट करणे, जातीचे दाखले, अंगणवाडीत मुलांचा शैक्षणिक श्रीगणेशा करणे अशी अनेक प्रकारची कार्य केली आहेत.



भारती कातकरी यांची नुकत्याच राजधानी नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टी-२० परिषदेत राज्यातून झालेली निवड आणि राजधानीत जगातील मान्यवरांच्या हस्ते झालेला सत्कार, परिसरात केलेल्या कार्याची दिलेली माहिती यामुळे केवळ चौक परिसरातच नाही, तर राज्यात त्यांच्या कार्याचा परिचय झाला आहे.

आदिवासी समाजासाठी कार्य करणाऱ्या धारा आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष अक्षरा अविनाश चौधरी यांनी संविधान दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन भारती कातकरी यांचा सन्मान केला. या वेळी सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी भारती कातकरी यांच्या कार्याचे कौतुक केले.

## महाडमध्ये ठाकरे गट, भाजपचा बॅनर फाडला

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील गवळ आळी येथे ठाकरे गट व भारतीय जनता पक्षाचा बॅनर अज्ञातांनी फाडल्याची घटना सोमवारी (दि.२७) सकाळी निदर्शनास आली. त्यामुळे काही काळ वातावरण तणावग्रस्त होते.

दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते घटनास्थळी जमा झाले व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात निरीक्षक मिलिंद खोपडे यांची भेट घेत सखोल चौकशी करण्याची मागणी केली तसेच असे भ्याड कृत्य करून समाजातील शांतता बिघडवण्याचे काम जे कोणी करीत असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करीत तसा लेखी तक्रार अर्जसुद्धा पोलीस ठाण्यात देण्यात आला. या वेळी ठाकरे गटातर्फे धनंजय देशमुख, सुदेश कळमकर, बंटी पोटफोडे, गणेश निगडेकर, लल्ला रत्नपारखी, सचिन पवार, राकेश पाटील, सुनील सुर्वे, अमित वाडकर; तर भाजपतर्फे अक्षय ताडफळे, सुरज बामणे, यश पाटील, मितेंद्र गांधी, सुनील तांबडे, निशांत वाडकर, अक्षय देसाई, प्रथमेश वरणकर आदी उपस्थित होते.

# चौक ग्रामपंचायतीमध्ये संविधान दिन उत्साहात



**चौक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान संपूर्ण देशाने स्वीकारले असून त्याचे आधारे आपला देश चालत आहे. आपल्या संविधानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे प्रतिपादन सरपंच रितू ठोंबरे यांनी केले.

चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. त्या वेळी सरपंच ठोंबरे बोलत होत्या.

एखादा देश चालविण्यासाठी आखून दिलेले मूळ आदर्श पायंडे, देश सुरक्षित चालविण्यासाठी केलेले नियम यालाच संविधान म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आले. संविधान लिहिण्यासाठी दोन वर्ष ११ महिने आणि १८ दिवस लागल्याची माहिती विधीतज्ज्ञ व ग्रामपंचायत सदस्य रिना सोनटक्के यांनी दिली.

संविधान किंवा राज्यघटना देश चालविण्यासाठी आदर्श नियमांचा संच असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव यांनी दिली.

या कार्यक्रमास उपसरपंच राजन गावडे, सदस्य निखिल मालुसरे, सुभाष पवार, पूजा हातमोडे, ऋषाली पोळेकर, नयना झिंगे, श्रीमती मालुसरे यांच्यासह ग्रामस्थ, कर्मचारी उपस्थित होते.


(छाया : अर्जुन कदम)

## माणगाव संगमेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमा साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही रविवारी (दि.२६) कार्तिकी पौर्णिमा अर्थात त्रिपुरारी पौर्णिमा भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यानिमित्त पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत भाविकांची दर्शनासाठी उपस्थिती होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

जुने माणगाव येथील संगमेश्वर मंदिरात दरवर्षी दीपोत्सव, महाशिवरात्री, त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी केली जाते तसेच श्रावणी सोमवारला या मंदिरात भाविकांची दिवसभर उपस्थिती असते. सालाबादप्रमाणे या वर्षी मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमा साजरी करण्यात आली. यानिमित्त सायंकाळी ७ वाजता दिवे लावण्यात येऊन महाआरती घेण्यात आली. या वेळी संपूर्ण मंदिर परिसर दिव्यांनी उजळून निघाला होता.

# नागोठणे भाजपतर्फे संविधान दिन साजरा

**नागोठणे : प्रतिनिधी, बातमीदार**

नागोठणे येथील भाजपच्या कार्यालयात रविवारी (दि.२६) भारतीय संविधान दिन अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस भाजप नेते आनंद लाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून संविधानाचे पूजन व शपथ घेण्यात आली, तर शिक्षण सेल रोहा तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे यांनी संविधानाचे वाचन केले.

या कार्यक्रमास भाजपचे नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, नागोठणे विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंखे, माजी अध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, जि. प. विभागीय अध्यक्ष शेखर गोळे, शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, शिक्षण सेल रोहा तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाळे, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष अंकुश सुटे, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष अपर्णा सुटे, विभागीय सरचिटणीस सोनाली पडवळ, विहार हेंडे, हेमंत लाड, मोहन लाड, जयराम गोरे, चंद्रकांत गोरे, परशुराम वरगुडे, कुशा वरगुडे, पांडुरंग गोरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी भाजप कार्यालयात उपस्थित कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पहिले.



# रेल्वेस्थानकांवर वोकल फॉर लोकलला प्राधान्य

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या ७९ स्थानकांवर एक स्टेशन एक उत्पादन आउटलेट्स आहेत, जिथे ६१ विविध स्थानिक लोकप्रिय उत्पादने विकली जात आहेत. वोकल फॉर लोकल व्हिजनला प्रोत्साहन देणे आणि स्थानिक व स्वदेशी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा यामागचा उद्देश आहे. या अंतर्गत नोंदणीकृत ओएसओपी लाभार्थ्यांनी आतापर्यंत २.४६ कोटीचे उत्पन्न मिळवले आहे.

केंद्र सरकारच्या वोकल फॉर लोकल व्हिजनला प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक व स्वदेशी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि उत्पन्नाच्या अतिरिक्त संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालयाने भारतीय रेल्वेवर वन स्टेशन वन प्रॉडक्ट (ओएसओपी) योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत समाजातील उपेक्षित घटक, स्वदेशी व स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन, विक्री आणि उच्च दृश्यमानता देण्यासाठी रेल्वेस्थानकांवर ओएसओपी आउटलेट दिले जातात. योजनेची सुरुवात २५ मार्च २०२२ रोजी झाली आणि २१ नोव्हेंबर २०२३पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रातील ७४ रेल्वेस्थानकांवर ७९ ओएसओपी आउटलेट्सने आहेत. हे ओएसओपी स्टॉल्स नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाईन अहमदाबाद यांनी संपूर्ण भारतीय रेल्वेमध्ये एकरूपतेसाठी डिझाईन केले आहेत.

वन स्टेशन वन प्रोडक्ट हे त्या-त्या ठिकाणासाठीचे वैशिष्ट्य आहे आणि त्यात स्थानिक जमातींनी बनवलेल्या कलाकृती, स्थानिक विणकरांच्या हातमाग, जगप्रसिद्ध लाकूड कोरीव काम, चिकनकारी आणि झारी-जरदोजी यासारख्या हस्तकला, कपड्यांवरचे काम किंवा चहा, कॉफी आणि इतर प्रक्रिया केलेले मसाले यांचा समावेश आहे. अर्ध-प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, उत्पादने या भागात स्वदेशी उगवले जातात.

महाराष्ट्रात रेल्वेस्थानकांवरील ओएसओपी आऊटलेट्सवरील विविध उत्पादनांमध्ये अहमदनगर येथे केळी, द्राक्षे, पापड, लोणचे, बडनेरा येथे सांबरवडी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे चामड्याची उत्पादने, चिंचवड येथे घरगुती अगरबत्ती, धूप, साबण, फिनाइल, चर्चगेट येथे चामड्याची उत्पादने, गोरेगाव येथे खादी उत्पादने; इगतपुरी येथे हंगामी फळे आणि पपई, द्राक्षे, सफरचंद, लोणचे, पापड इ. हाताने बनवलेली कोल्हापुरी चप्पल, कणकवली व कुडाळ येथे लाकडी खेळणी, लोणावळा येथे चिक्की व फज उत्पादने, नाशिक रोड येथे पैठणी साड्या, पंढरपूर येथे विठ्ठलमूर्ती, कुमकुम, अगरबत्ती व इतर पुजेचे साहित्य, नागपूर येथे बांबूचे साहित्य, परळ येथे टेक्सटाईल आणि हातमाग, पिंपरी येथे हाताने बनवलेल्या पर्स बॅग (कागद आणि कापडापासून बनवलेल्या), सातारा येथे कंदी पेढा, शेगाव येथे पापड, सोलापूर येथे सोलापुरी चादर, बेडशीट आणि टॉवेल, वापी आणि बोरीवली येथे वारली कला आणि हस्तकला, वसई रोड आणि नालासोपारा येथे सॉफ्ट टॉईज यांचा समावेश आहे.

## चौलच्या रामेश्वर मंदिरात दीपोत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त अलिबाग तालुक्यातील चौल येथील प्राचीन श्री रामेश्वर मंदिरात रविवारी (दि.२६) दीपोत्सव साजरा करण्यात आला. मंदिराला एलईडी दिव्यांची आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. विद्युत दिव्यांच्या विविधरंगी प्रकाशात मंदिर आणि परिसर न्हाऊन निघाला.

मंदिरासमोरील पुष्करणीत या विद्युत रोषणाईचे पडणारे प्रतिबिंब अधिकच खुलून दिसत होते. या वेळी शोभेच्या फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली. हा दिव्यांचा नयनरम्य सोहळा डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती, तर सोशल मीडियातही याचे फोटो शेअर झाले.

# नागोठण्यात सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक संस्थेची स्थापना

## किशोर म्हात्रे अध्यक्षपदी

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील हॉटेल इंद्रप्रस्थमधील सभागृहात झालेल्या सभेत नागोठणे विभागीय सांस्कृतिक, सामाजिक संस्थेची स्थापना करण्यात आली. या वेळी शहर व विभागातील नागरिक उपस्थित होते.

या संस्थेत अध्यक्षपदी किशोर म्हात्रे, कार्याध्यक्षपदी विलास चौलकर, उपाध्यक्षपदी संतोष कोळी, सरचिटणीसपदी संदेश गायकर, सहसरचिटणीसपदी चेतन कामथे, खजिनदारपदी एकनाथ ठाकूर, सहखजिनदारपदी अनंत थिटे, सल्लागार म्हणून संजय भोसले, प्रवीण ताडकर, विक्रांत घासे, महेंद्र माने, महेश जाधव, राज वैशंपायन, लहू तेलंगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. महेश धामणे काम पाहणार आहेत.



# अखेर हार्दिकची मुंबईत घरवापसी



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगसाठी अष्टपैलू क्रिकेटपटू हार्दिक पांड्याला आपल्या संघात परत घेण्यात मुंबई इंडियन्सला यश आले आहे. आयपीएलच्या आगामी हंगामाकरिता प्रत्येक संघाने आपल्याकडे कायम ठेवलेल्या (रिटेन केलेल्या) आणि करारमुक्त केलेल्या (रिलीज केलेल्या) खेळाडूंच्या याद्या रविवारी जाहीर केल्या. त्यानंतर आता खेळाडू ट्रेड करण्याची (खेळाडूंची अदलाबदली) विंडो १२ डिसेंबरपर्यंत खुली असणार आहे. दरम्यान, मुंबई इंडियन्सने या ट्रेडिंग विंडोचा वापर करून आपला जुना खेळाडू हार्दिक पांड्याला आपल्याकडे परत घेतले आहे.

हार्दिक मुंबईकडे परतण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. याबद्दल मुंबई इंडियन्स आणि आयपीएलने अधिकृत घोषणा केली आहे. दरम्यान, हार्दिकनंतर गुजरात टायटन्सच्या कर्णधारपदी कोणाची वर्णी लागणार असा प्रश्न अनेकांना पडला होता. याच उत्तरदेखील समोर आलं आहे.

येत्या १९ डिसेंबर रोजी दुबईत आयपीएलमधील खेळाडूंची लिलावप्रक्रिया पार पडणार आहे. त्यापूर्वी १२ डिसेंबरपर्यंत खेळाडूंची अदलाबदली करण्याची मुभा आहे. हार्दिक पांड्या मुंबई संघात परतण्याची प्रक्रिया झाली असून तो आता मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दाखल झाला आहे. आयपीएलने याबाबत अधिकृत घोषणा केली आहे.

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात २०२२मध्ये गुजरातचा संघ चॅम्पियन झाला होता तसेच त्याच्या पुढच्या हंगामात हा संघ उपविजेता ठरला होता. मागील काही दिवसांपासून हार्दिक गुजरातची साथ सोडण्याच्या तयारीत असल्याच्या बातम्या समोर येत होत्या. आता यावर शिक्कामोर्तब झाला असून अधिकृतरित्या तो मुंबईच्या फ्रँचायझीचा सदस्य झाला आहे.

हार्दिक पांड्याने मुंबई इंडियन्सकडे आल्यानंतर सोशल मीडिया पोस्ट केली आहे. त्यात पहिल्या आयपीएल लिलावामध्ये त्याचा मुंबई इंडियन्समध्ये समावेश करण्यात आल्याचा प्रसंग दिसत आहे. 'आय एम कमिंग होम' हे गाणेही व्हिडीओमध्ये ऐकू येत आहे.

## शुबमन गिल गुजरात टायटन्सच्या कर्णधारपदी



**गांधीनगर : वृत्तसंस्था**

हार्दिक पांड्यानंतर गुजरात टायटन्सच्या कर्णधारपदी कोणाची वर्णी लागणार असा प्रश्न अनेकांना पडला होता. याचे उत्तरदेखील समोर आले आहे. गुजरात टायटन्सच्या संघव्यवस्थापनाने शुबमन गिलकडे संघाची कमान सोपवली आहे.

गुजरातच्या संघात अनुभवी आणि युवा खेळाडूंची मोठी फळी असून शुबमन गिल व्यतिरिक्त केन विल्यमसन, मोहम्मद शमी, वृद्धिमान साहा, विजयशंकर, साई किशोर, राशिद खान, डेव्हिड मिलर हे नामांकित खेळाडू गुजरातच्या ताफ्यात आहेत. गिलसह टायटन्सच्या सर्व खेळाडूंनी मागील दोन हंगामात चमकदार कामगिरी केली आहे.

गुजरात टायटन्स हा संघ २०२२मध्ये आयपीएलमध्ये सहभागी झाला. पदार्पणाच्या स्पर्धेत कर्णधार हार्दिक पांड्याने या संघाला आयपीएलचे जेतेपद पटकावून दिले होते, तर यंदादेखील हा संघ फायनलमध्ये दाखल झाला होता, परंतु अंतिम सामन्यात चेन्नई सुपरकिंग्सने गुजरातवर मात केली. सलग दोन वेळा आयपीएल फायनल गाठल्याने एक बलाढ्य संघ म्हणून गुजरात टायटन्सचे नाव घेतले जाते. त्यामुळे हार्दिकनंतर या बलाढ्य संघाची धुरा शुबमन गिल कशी सांभाळतो याकडे क्रिकेटरसिकांचे लक्ष असेल.

## यशस्वी, इशान आणि ऋतुराजचा पराक्रम

### टी-२० सामन्यात तीन भारतीयांचे पहिल्यांदाच अर्धशतक








**तिरुवनंतपूर : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना जिंकून भारतीय संघाने मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. यासह यशस्वी जैस्वाल, इशान किशन आणि ऋतुराज गायकवाड या त्रिकुटाने एकाच सामन्यात अर्धशतक करण्याचा पराक्रम नावावर केला. यापूर्वी भारतीयांना अशी कामगिरी करता आली नव्हती.

सामन्यात भारतीय फलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. प्रथम फलंदाजी करताना टीम भारताने २३५ धावांची मोठी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाला केवळ १९१ धावा करता आल्या. आणि ४४ धावांनी सामना गमावला. यशस्वी जैस्वालने झंझावाती सुरुवात करीत २५ चेंडूंत नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ५३ धावा केल्या. यानंतर इशान किशनने ३२ चेंडूत ५२ धावा जोडल्या. त्याने तीन चौकार आणि चार षटकार मारले, तर ऋतुराज गायकवाडनेही ४३ चेंडूत ५८ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्याने दोन षटकार आणि तीन चौकार मारले.

टी-२० क्रिकेटच्या इतिहासात भारताच्या पहिल्या तीन फलंदाजांनी अर्धशतके ठोकण्याची ही पहिलीच वेळ होती. टी-२० क्रिकेटमधील मागील चार सामन्यांमध्ये असे घडले होते, जेव्हा संघाच्या पहिल्या तीन फलंदाजांनी अर्धशतके केली होती, परंतु एकाही प्रसंगी त्यात भारताचा सहभाग नव्हता.

# मुंबई इंडियन्सकडून जोफ्रा आर्चरसह सहा परदेशी खेळाडू करारमुक्त



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सच्या रिटेन व रिलीज खेळाडूंची नावे समोर आली. मागील दोन वर्ष केवळ नाव म्हणून संघात कायम ठेवलेल्या जोफ्रा आर्चरला मुंबई इंडियन्सने अखेर रिलीज करण्याचा निर्णय घेतला गेला.

मुंबई इंडियन्सने रविवारी रिलीज केलेल्या ११ खेळाडूंपैकी पाच खेळाडू परदेशी खेळाडू आहेत. जोफ्रासह त्रित्सान स्तब्स, ड्युअन यानसेन, झाय रिचर्डसन, रिली मेरेडिथ व ख्रिस जॉर्डन या परदेशी खेळाडूंना करारमुक्त करण्याचा निर्णय मुंबई इंडियन्सने घेतला. यांच्यासह अर्शद खान, रमनदीप सिंग, हृतिक शोकीन, राघव गोएल व संदीप वॉरियर हेही मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात दिसणार नाही.

याचबरोबर पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सने रोहित शर्मा, डेवॉल्ड ब्रेव्हिस, सूर्यकुमार यादव, इशान किशन, तिलक वर्मा, टीम डेव्हिड, विष्णू विनोद यांना कायम राखले आहे. अर्जुन तेंडुलकरने मागील पर्वात आयपीएलमध्ये पदार्पण करताना ठिकठाक कामगिरी केली होती. तोही संघात कायम आहे. कॅमेरून ग्रीन, शॅम्स मुलानी, नेहाल वढेरा, जसप्रीत बुमराह, कुमार कार्तिकेय, पीयुष चावला, आकाश माधवाल, जेसन बेहरेनडॉर्फ, रोमारियो शेफर्ड (ट्रेड लखनौ सुपरजायंट्स) यांनाही मुंबईने कायम राखले आहे.

# कोलकाताकडून शार्दुलसह १२ जणांना बाहेरचा रस्ता



**कोलकाता : वृत्तसंस्था**

गौतम गंभीर कोलकाता नाईट रायडर्सकडे मार्गदर्शक म्हणून परतला आहे. यामुळे दोन वेळच्या चॅम्पियन संघाने अनेक खेळाडूंना सोडण्याची अपेक्षा होती. २०१४मध्ये शेवटचे विजेतेपद जिंकल्यानंतर कोलकाता फ्रँचायझी स्पर्धेत प्रभाव पाडण्यात अपयशी ठरल्याने त्यांनी एकूण १२ खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. शार्दुल ठाकूर, उमेश यादव आणि शाकिब अल हसन हे काही मोठे तिकिट असलेले खेळाडू आहेत, ज्यांना कोलकाता नाईट रायडर्सने सोडले आहे, तर केकेआरने श्रेयस अय्यर, नितीश राणा आणि रिंकू सिंग यांना कायम ठेवले आहे.

दुखापतीमुळे गेल्या मोसमात मुकलेला कर्णधार श्रेयस अय्यर आगामी मोसमात पुनरागमन करण्यासाठी सज्ज आहे. विश्वचषकादरम्यान तो चांगल्या फॉर्ममध्ये दिसत होता आणि तो पुन्हा एकदा कर्णधारपदाची धुरा सांभाळण्यासाठी उत्सुक आहे. याशिवाय नितीश राणा, रिंकू सिंग, रहमानउल्ला गुरबाज, श्रेयस अय्यर, जेसन रॉय, अनुकुल रॉय, आंद्रे रसेल, व्यंकटेश अय्यर, सुयश शर्मा, हर्षित राणा, सुनील नरेन, वैभव अरोरा, वरुण चक्रवर्ती संघात असतील.

दुसरीकडे टिम साऊदी, उमेश यादव, लॉकी फर्ग्युसन, शार्दुल ठाकूर, मनदीप सिंग, कुलवंत खेजरोलिया, एन जगदीसन, डेव्हिड विस, आर्या देसाई, लिटन दास, जॉन्सन चार्ल्स, शकीब अल हसन हे आता या संघात नसतील.

# धोनीच सांभाळणार चेन्नईची धुरा



**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जने आयपीएल २०२४ हंगामासाठी चेन्नईने खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. सीएसके चाहत्यांच्या ज्या निर्णयाकडे लक्ष लागले होते तो महत्त्वाचा निर्णय म्हणजे महेंद्रसिंह धोनी हा हंगाम खेळणार की नाही याकडे. सीएसकेने चाहत्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. धोनी पुन्हा पिवळ्या जर्सीत दिसणार आहे. धोनीला चेन्नईने कायम ठेवले असून अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सला सोडले आहे.

सीएसकेने महेंद्रसिंह धोनी, रवींद्र जडेजा, ऋतुराज गायकवाड, मोईन अली, डेव्हॉन कॉनवे, शिवम दुबे, मिशेल सँटनर, दीपक चहर, अजिंक्य रहाणे, राजवर्धन हंगेकर, तुषार देशपांडे, सिमरजीत सिंग, मथिशा पाथिराना, प्रशांत सोळंकी, महिष तेक्षाना, अजिंक्य शेख, एन. एन. सिंधू, अजय मंडल, मुकेश चौधरी, निशांत सिंधू यांना कायम ठेवले आहे, तर अंबाती रायडू, बेन स्टोक्स, ड्वेन प्रिटोरियस, काईल जेमिसन, भगत वर्मा, सुभ्रांशू सेनापती, सिसाडा मगला, आकाश सिंग यांना संघाबाहेर केले आहे.

मागील हंगामात सीएकसेने मोठा निर्णय घेत धोनीऐवजी फिरकीपटू रवींद्र जडेजाकडे संघाचे नेतृत्व दिले होते, मात्र जडेजाला संघ नेतृत्व करण्यात अपयश आल्याने पुन्हा संघाचे नेतृत्व धोनीकडे देण्यात आले होते. आगामी आयपीएलमध्ये धोनी खेळणार नसल्याने जडेजाकडे संघाचे नेतृत्व सोपविल्याची चाहत्यांमध्ये चर्चा होती, पण आता या चर्चांवर पडदा पडला असून धोनीच्या नेतृत्वात सीएसके पुन्हा मैदानात उतरण्यासाठी सज्ज झाली आहे.

## राजस्थान रॉयल्सने होल्डरसह नऊ खेळाडूंना केले रिलीज



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या नव्या हंगामाला सामोरे जाण्यापूर्वी राजस्थान रॉयल्सने नऊ खेळाडूंना रिलीज केले आहे, तर संजू सॅमसनसह अन्य खेळाडूंना कायम राखले आहे.

राजस्थान रॉयल्सने रिलीज केलेल्या खेळाडूंमध्ये जो रूट, अब्दुल बसिथ, जेसन होल्डर, आकाश वशिष्ठ, कुलदीप यादव, ओबेड मॅकॉय, मुरुगन अश्विन, केसी चरिअप्पा, केएम आसीफ यांचा समावेश आहे.

दुसरीकडे संजू सॅमसन, जोस बटलर, शिमरोन हेटमायर, यशस्वी जैस्वाल, ध्रुव जुरेल, रियान पराग, डोनोव्हॅन फेरेरा, कुणाल राठोड, आर अश्विन, कुलदीप सेन, नवदीन सैनी, युझवेंद्र चहल, ॲडम झम्पा, आवेश खान (ट्रेड-लखनौ सुपरजायंट्स), ट्रेंट बोल्ट, संदीप शर्मा, प्रसिद्ध कृष्णा संघात कायम आहेत.

# सात्त्विक-चिराग जोडीला चीन मास्टर्स स्पर्धेचे उपविजेतेपद



**शेनझेन : वृत्तसंस्था**

भारताचे स्टार बॅडमिंटनपटू सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला रविवारी चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम लढतीत त्यांना चीनच्या लियांग वेई केंग आणि वांग चांग जोडीविरुद्ध पराभव पत्करावा लागला.

भारताच्या जोडीने पहिला गेम १९-२१ असा गमावला. त्यानंतर शानदार रॅली करताना त्यांनी दुसरा गेम २१-१८ असा जिंकत लढतीत पुनरागमन केले. निर्णायक गेममध्ये १-८ अशा पिछाडीवरून त्यांनी पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण तिसरा गेम १९-२१ असा गमावल्याने भारताच्या जोडीला एक तास ११ मिनिटे रंगलेल्या लढतीत पराभव पत्करावा लागला. ही जोडी दुसऱ्या बीडब्ल्यूएफ सुपर ७५० विजेतेपदापासून अवघ्या एका विजयाच्या अंतरावर होती, मात्र लियांग वेई केंग आणि वांग या जगातील अव्वल जोडीने त्यांचे स्वप्न उद्‌ध्वस्त केले. हांगझोऊ आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या भारतीय जोडीने दुसऱ्या गेममध्ये पुनरागमन करीत सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. चीनच्या जोडीने संयम राखताना विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

# आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर राहण्याचा ब्राव्होचा निर्णय



**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज क्रिकेट संघाला त्याच्या मायदेशात इंग्लंडविरुद्ध तीन वनडे आणि पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. याबाबत, क्रिकेट वेस्ट इंडिज वनडे मालिका संघाची घोषणा झाल्यानंतर त्यांच्या दिग्गज खेळाडूंपैकी एक मानल्या जाणार्या डॅरेन ब्राव्होने आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे.

वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाकडून ब्राव्होकडे दीर्घकाळ दुर्लक्ष केले जात होते. त्यानंतर त्याने हा निर्णय घेतला आणि याकडे त्याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती म्हणूनही पाहिले जात आहे.

डॅरेन ब्राव्होने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून ब्रेक घेण्याच्या आपल्या निर्णयाची माहिती दिली, ज्यामध्ये त्याने लिहिले की, क्रिकेटपटू म्हणून पुढे जाण्यासाठी माझे पुढचे पाऊल काय आहे याचा विचार करण्यासाठी मी थोडा वेळ घेतला आहे. आणि मी विचार केला आहे की, एक क्रिकेटर म्हणून पुढे जाणे ही मोठी पैज आहे. या वेळी माझ्यासाठी समान ऊर्जा, जोश, बांधिलकी आणि शिस्तीने आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे सोपे नाही.

सध्या तिन्ही फॉरमॅटमध्ये वेगवेगळे खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करीत आहेत, हे सुमारे ४०-४५ खेळाडू आहेत. धावा करूनही मी कोणत्याही संघाचा भाग नाही. मी हार मानली नाही, मी फक्त त्यापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे, असेही ब्राव्होने नमूद केले आहे.

यंदा एकदिवसीय वर्ल्डकपसाठी पात्र न ठरलेल्या वेस्ट इंडिज क्रिकेट संघाची गेल्या काही वर्षांत कसोटी आणि एकदिवसीय प्रकारात अत्यंत खराब कामगिरी पाहायला मिळाली आहे. डॅरेन ब्राव्होबद्दल सांगायचे तर, त्याने २०२२मध्ये अहमदाबादच्या मैदानावर भारताविरुद्ध एकदिवसीय सामना म्हणून शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. या सामन्यात तो केवळ १९ धावा करून बाद झाला.

ब्राव्होने वेस्ट इंडिजसाठी ५६ कसोटीत ३५३८ धावा, १२२ एकदिवसीय सामन्यांमध्ये ३१०९ धावा आणि २६ टी-२० सामन्यांत ४०५ धावा केल्या आहेत. ब्राव्होच्या नावावर कसोटी फॉरमॅटमध्ये आठ आणि वनडेमध्ये चार शतके आहेत.

## बांगलादेशच्या शाकिबची राजकारणात एन्ट्री!

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशचा कर्णधार शाकिब अल हसन नव्या खेळीची सुरुवात करीत असून त्याने राजकारणात पाऊल ठेवले आहे. आयसीसी वन डे विश्वचषक २०२३मध्ये वादग्रस्त अपीलमुळे चर्चेत राहिलेला शाकिब आता लोकसभेची निवडणूक लढणार आहे. तो त्याच्या जिल्ह्यातील मागुरा-१ या मतदारसंघातून नशीब आजमावत आहे.

७ जानेवारीपासून होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी बांगलादेश अवामी लीगकडून शाकिब निवडणुकीच्या मैदानात असणार आहे. शाकिबच्या आधी मशरफे मुर्तजा याने निवडणूक लढली आहे. खरेतर त्याने खासदार असतानादेखील क्रिकेट खेळले आहे. निवडणूक लढण्यापूर्वी शाकिब बांगलादेशच्या संघाचे कर्णधारपद सोडणार असल्याचे कळते. काही दिवसांपूर्वी त्याने याचे संकेत दिले होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com